अगतिकता दृष्टीस पडते. 'हारून फ्रेम वर्क्स' मधली शाहिदाबी, हारून, रशीद काहीबाही बोलू लागतात. दंग्याचं लोण हारूनच्या दुकानापर्यंत, घरापर्यंत आणि नंतर गिळून टाकते त्याचं अस्तित्व, जगणं, अगदी फ्रेमसकट, उरते फक्त राख. 'झुंबर' कथेत भेटतात. धनकू, दगडूशेठ ती वरात, मिरवणूक. धनकूच्या डोक्यावर आहे. लखलखतं झुंबर; दारिद्र्याचं, जगण्याचं, वेदनेचं. झुंबर कोसळतं, धनकूला घेऊन, 'ईस्साक पक्का हिंदू होता' कथेतला हनुमान चालीसा म्हणणारा ईस्साकही 'धर्म' नावाच्या चक्रात भरडला जातो. 'प्रॉपर्टी एक्झिबिशन' कथेत बंद पडलेल्या फॅक्टरीचे सांगाडे, त्यांना चिकटलेले कामगारांचं रक्त आणि घाम आणि तिथं उभी राहणारी टॉवर संस्कृती. पुन्हा ज्यांना संपवण्याची भाषा वापरणाऱ्या तिसरा डोळा उघडते. 'जावेद जिवंत आहे' कथेमध्ये नुर हॉटेलचा मालक नूर, जमील, जमीलशी निकाह करून मुसलमान झालेली, रखमा, उस्मान, नवीन भाई, अशा व्यक्तिरेखांनी रेखाटलेली नाट्यामध्ये शेवटी तो जावेद कोण होता, हे कळल्यावर आपण नखशिखान्त हादरून जातो.

संग्रहातील शेवटची कथा 'तिसरा डोळा' आहे. प्राचीन शिवमंदिराच्या पार्श्वभूमीवरची ही एक वेगळीच कथा. जत्रेत डोंबारी खेळ करणारी मंगळी आणि रस्त्यावर देवाचं चित्र काढणाऱ्या जगल्याचा मुलगा. जगल्या मेल्यावर मंगळीवर उपासमारीची वेळ येते आणि तेव्हाच तिला मार्ग सापडतो; शंकरासारखं डमरू वाजवणाऱ्या, तांडव करणाऱ्या, शंकराची गाणी पाठ असणाऱ्या म्हादूला शंकराचं सोंग बनवून पैसे कमावण्याचा. म्हादूला हे कळताच आनंद होते, त्याच्यासाठी शंकर बनणं पैसे कमावण्याचा मार्ग नाही, शंकरावर प्रचंड भक्ती असलेल्या म्हादू शंकर बनतो. आणि मग जे होतं ते म्हणजे 'तिसरा डोळा' कथा. या सर्व कथा वाचल्यावर संपून गेलेल्या माणसांचं जग पाहण्यासाठी आपल्याला तिसरा डोळा लागतो.

FOR EDUCATIONAL USE

2022-23 Semester VI

# सोनोपंत दांडेकर महाविद्यालय पालघर

विद्यार्थ्याचे नाव - हर्षित रमेश चुरी

वर्ग - तृतीय वर्ष - कला शाखा

विषय - मराठी - पेपर - सहा

प्रकल्पासाठी निवडलेले पुस्तक - "तत्पुरूष"

रोल नं - 732

विषय प्राध्यापक - श्री. विवेक कुडू सर

19/20 Wandre

# "अनुक्रमणिका"

1. प्रस्तावना
2. उद्दिष्ट्ये
3. कवयित्रीची ओळख
4. काव्यसंग्रहातील कवितांचा सारांश
5. निष्कर्ष
6. आधार

# " प्रस्तावना "

एका स्त्रीची स्वतंत्र ओळख काय असते, तिच्या इच्छा, आकांक्षा काय असतात व समाजात या सर्व तिच्याशी निगडीत गोष्टींना समाज कोणत्या दृष्टिकोनातून पाहतो व तिला समाजाने एक वेगळे स्थान आता-पर्यंत तरि दिले आहे का ? या सर्व गोष्टी 'तत्पुरुष' हा कवितासंग्रह उपस्थित करतो.

यामध्ये कवयित्री एक सर्वसामान्य स्त्री म्हणून तिचे जीवन, जीवनातील तडजोड, तिचा दृष्टिकोन, घरात एक सर्वसामान्य घरात गृहिणी म्हणून तिच्या भावना, एक पत्नी म्हणून, पतीचा मृत्यू झाल्यानंतर एक विधवा म्हणून जगणे जगत असताना येणारे अनुभव व यातून वाचकाला या काव्यसंग्रहातील उपस्थित सर्व विषयांवर स्वतंत्र विश्लेषण करता येते. या प्रकल्प अहवालामध्ये प्रस्तुत काव्यसंग्रह 'तत्पुरुष' याच्यातील अनेक कवितांचा सखोल अभ्यास करून त्यातील अनेकार्थता, खोलवर गेलेला कवितांचा अर्थ, आणि स्त्री-जीवनाचे विविध पैलू समजून घेणे आवश्यक आहे.

'तत्पुरुष' यातील कविता या पूर्णपणे स्त्रीवादी असून दैनंदिन जिवनात तिला सामाना कराव्या ~~लाग~~ लागणाऱ्या बाबींवर प्रकाश टाकला गेला आहे. स्त्री-सौंदर्याबरोबरच तिच्या सोबत येणारे जन्मजात दुःख हे, दुःख जन्मजात आलेले नसून ती आपल्यावर नकळतपणे ओढवून घेत असते आणि समाज व संसारात अशी काहि गुरफटून गेलेली असते कि स्वतःचे अस्तित्व विसरली असते. तिच्या या आंतरिक भावभावनांचे उलगडिकरण करण्याचे कार्य कवयित्रीने केले आहे.

# उद्दिष्टे

1) या प्रकल्पअहवालासाठी 'तत्पुरुष' या काव्यसंग्रहाची निवड करून यातील कवितांचे खोलवर अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करणे.

2) एक स्त्री म्हणून जगत असताना, समाजत येणारे अनुभव व यातून वाचकाला या काव्यसंग्रहातील उपस्थित सर्व विषयांवर स्वतंत्र विश्लेषण करता यावे.

3) या कवितांच्या मार्फत समाजात स्त्रीला दिले जाणारे दुय्यम स्थान, कमजोर म्हणून पाहण्याचा दृष्टीकोन बदलण्याचा हेतू आहे.

4) स्त्री हि फक्त आपल्या संसारात अडकून राहिलेली असते व त्यांत तिचे कशाप्रकारे हाल होतात हे मांडणे.

5) एकणच समाजात चालेले भेदभाव, अनिष्ट प्रथा, त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन कुठेतरी चुकतोय आणि स्त्री एक केवळ राबणारे यंत्र किंवा वापरण्याची वस्तू नसते तर, ती पण एक माणूस आहे, तिलाहि तिचे हक्क आणि स्वतंत्रपणे जगण्याचा अधिकार आहे, हे समाजाला या कवितांमधून आलेले संदेश समजावून सांगणे.

## "कवयित्रीची ओळख"

'तत्पुरुष' या काव्यसंग्रहाच्या लेखिका /कवयित्री 'कविता महाजन' या आहेत. त्यांनी कविता, कादंबरी लेखन करत असताना स्वतंत्रपणे संपादन आणि अनुवाद कौशल्यही त्यांनी सिद्ध केले. एका बाजूला आपल्या लेखनातून प्रश्नांचा वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले, तर दुसरीकडे साहित्याच्या विविध रूपांनाही साकारले. या अर्थाने त्यांचा साहित्य व्यवहाराचा परिघ मोठा होता. म्हणून त्यात बालसाहित्य, ब्लॉग लेखन आणि पाकशास्त्र यांचाही समावेश झाला.

त्यांच्या साहित्याची दखल मराठी जगताने घेतली आणि त्यांना यथोचित पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले. याशिवाय, कवयित्री बहिणाबाई पुरस्कार, यशवंतराव चव्हाण - प्रतिष्ठानचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मिती पुरस्कार असेही सन्मान त्यांना प्राप्त झाले. त्यांच्या निधनाने सर्जनशील कवयित्री, लेखिका आणि अनुवादक हरपला गेला.

तत्पुरुष या काव्यसंग्रहातील काही निवडक कविता घेवून त्यांचे खोलवर अर्थ, अनेकार्थता आणि त्यात स्त्री-ची भूमिका कोणती आहे, कवयित्री नेमक्या कोणत्या संदर्भात बोलण्याचा प्रयत्न करित आहेत हे जाणून घेणे महत्त्वाचेच आहे.

## "खात्री"

खात्री →

कोणत्याही गोष्टीची आपण खात्री देऊ शकत नाही. पुढे काय होईल ? हे सुरुवातच कोणालाही माहीत असेलच अस नाही. या कवितेत कवियत्रींनी, एखाद्या स्त्रीला ~~अनेक~~ स्वकीयांकडून अनेक उपहार, भेटवस्तू दिल्या जातात, तिच्या आवडत्या वस्तू आणि आपलंस वाटणार, ~~घर~~ घर म्हणजे स्वतःसाठी सुरक्षित वाटणारं ठिकाणं. पण याच घरात राहून आजची स्त्री सुरक्षित आहे का ? असा प्रश्न कवयित्री मांडण्याचा प्रयत्न करित आहेत.

घरात स्त्री स्वतःला सुरक्षित मानत असते परंतु बाहेरच्या वादळांपासून ~~घेतल~~ वाचण्यासाठी घेतलेला घराचा आधार हा, कितपत सुरक्षित असू शकतो ?

दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या गुन्हेगारीचे प्रमाण पाहता, आजकाल स्वतःच्या घरातून मुलींना पळवून नेले जाते हे मात्र तितकेच खरे आहे.

या कवितेत, कवयित्री समाजाला प्रश्न विचारत आहेत कि, तुम्ही तुमच्या जवळच्या ~~म~~ स्त्रीयांना अनेक वस्तू देता, मग तिला ~~त्या~~ तिच्याच सुरक्षिततेची खात्री देऊ शकता का ?

# "सोदा"

सोदा या कवितेत कवयित्रींनी, स्त्री-जीवनाची होणारी घालमेल आणि अस्तित्वावर भाष्य केले आहे. सोदा घेऊन जशी एखादी गोष्ट मालकाकडून दुसऱ्या मालकाकडे जात राहते, अगदी तसेच या कवितेतून करून येते.

पुरातन काळापासून ते आजपर्यंत हि रीत अशीच सुरू आहे. स्त्रीला माणूस न मानता तिच्या भावनांचा, स्वातंत्र्याचा हल्ली सोदा केला जातोय. आधी पालकांकडे राहून, प्रत्येक गोष्ट निमूटपणे सहन करायची, मग त्यात भाऊ-बहिणी मध्ये असमानता, कायदे-नियम, संस्काराच्या ~~ओझ्यात~~, भावाखाली प्रत्येक गोष्टीत पारतंत्र्यता, निर्णय न घेण्याचा अधिकार अशा गोष्टीत असतांना वय सोळं कि या मुलींची साखळी बापाकडून दुसऱ्या पुरुषाकडे जाते आणि मग आयुष्यभर हेच चालू राहतं. फरक फक्त एवढाच कि हक्क गाजवणारी आणि ताब्यात ठेवणारी व्यक्ती बदलते, बाकी सर्व काही सारखंच, तोच अपमान, तेच पारतंत्र्य, तेच दुःख, वागण्याची वृत्ती. मग तरीहि कवयित्रीला प्रश्न पडतोय, कि हे जर परंपरा नुसार नेहमीच होत असेल आणि फक्त व्यक्ती बदलत असेल तर मग डोळ्यांत पाणी तरी का? आणि कशासाठी यावं?

# "शिक्कामोर्तब"

आज प्रत्येक व्यक्ती स्वतंत्र आहे, कायद्यानुसारही आणि निसर्ग नियमानुसारही. पण हे सगळं असूनही, काही धक्कांच स्थान हे कितीही काहीही झालं तरि विधिलिखीत असल्यासारखं बदलताना दिसत नाही. विशेषतः या काही धक्कांमध्ये स्त्रीया मोडतात हि संकाच नाही. कवी ला सांगायचे आहे की, स्त्री हि कोणाच्याच मालकीची नसते, ती स्वातंत्र्य आहे. आणि माणूस म्हणून जगण्याचा तिलाही हक्क आहे. पण तरीहि शतकानुशतके गुलाम बनवणाऱ्या तिला म्हणजेच, विशेषतः पुरूषप्रधान संस्कृतीला, ती एक वस्तू आहे, गुलाम आहे. आणि आपण तिचे मालक आहोत हिच भावना तिच्याप्रती निर्माण होते. आणि त्यामुळे ती वस्तू वापरली नाहि तर, ती वाया जाते, या तत्वानुसार तिला गुलामीत, बंदिस्त ठेवले नाही, तिच्यावर वर्चस्व दाखवलं नाहीतर ती आपल्यावर सरस होईल, नाहीतर ती बिघडेल अशी मतं होतात, आणि मग ~~तसेच~~ जरीहि काहीहि, मालकी नसली, तरी स्त्रीला त्यांच्या मतानुसार वागावे लागते. म्हणजेच तिच्यावर गुलामीचा शिक्का मोर्तब केला जातो. ते हि ती, सार्वजनिक मालमत्ता असून, आपला तिच्यावर हक्क आहे हेच समजून.

# "निदान"

निदान या कवितेते कवितेत कवयित्रींनी स्त्री-भ्रूण हत्ये विषयी सांगीतले आहे. कवितेतल्या स्त्रीला तिच्या गर्भात असणाऱ्या, आणि नंतर गर्भातच त्या बाळाला मारुन टाकले जाते, याविषयी कवयित्री म्हणतात की, त्या स्त्रीला आजही आठवते की तिच्या गर्भातून तिच्या बाळाला काढून टाकण्यात आले.

या भ्रूणाला अजून स्त्री-किंवा-पुरुष म्हणून ओळखही या जगात नव्हती. त्यांना अवयव हि निट परिपूर्ण नव्हते. आईच्या गर्भातच असताना हत्या केली गेल्यामुळे त्यांना या जगाची, कशाचीही जाण नव्हतीच. या जगातल्या जातिभेद, धर्म, पैसा, सत्ता, राजकारण, यांपासून ते खुप लांब आणि निष्पाप होते.

या जगात जन्माला येण्यासाठी कदाचित त्यांनी चुकीचं गर्भाशय निवडलं होतं. किंबहुना गर्भाशयाने निवडलेला, त्याच्या मुलांना जन्म देणारा पुरुष चुकीचा ठरला होता.

कवितेत स्त्री-भ्रूण हत्या हि एक स्त्रीला कशाप्रकारे घातक किंवा मानसिक त्रास देऊ शकते याविषयी भाष्य करते. परंतु जन्माला न आलेले ते भ्रूण त्याची काय चूक होती? जी त्याला मृत्यूशी सामना करावा लागला, हा प्रश्न मात्र कायम उभा आहे.

# "मर्यादा"

समाजात, असो वा संसारात स्त्रीला नेहमीच कमकुवत समजले जाते. वारंवार आणि असेच आयुष्यभर तिला जवळच्या माणसांकडून ऐकून घ्यावे लागते. आपल्या पतीचे विनाकारण बोलणे खावे लागते. हे असेच चालू असताना तिला या सर्व गोष्टी असह्य होतात आणि ती एक ना एक दिवस बंड करते. आणि हा बंड कोणाविरुद्ध असतो? हा बंड असतो अन्यायाविरुद्ध शोषणाविरुद्ध. तिला नेहमीच डावलून बोलले जाते. कधीकधी, आक्षेप, आरोप, शंका, हजारो प्रश्न असं दहकते प्रश्न तिच्यासमोर मांडले जातात. असे सर्व काही सोसून जर तिने आपल्या पतीला प्रतिउत्तर देण्याची हिम्मत केली तर, पुरुषांना ते सहन होत नाही. कारण, एकच की त्यांच्यातली पुरुषीपणा. पुरुषी वृत्ती.

मात्र आपल्याही मर्यादांच्या रेषा थोड्या स्पष्ट करून, त्यांच्यावरचा पडदा खाली पाडून, पाडून द्याव्याच लागतात कधी ना कधी. आणि अन्यायाविरुद्ध जाऊन, प्रतिकाराला सामोरे जावेच लागते. असं या कवितेत कवयित्रींना मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

# " धास्ती "

संसाराच्या जाळ्यात अडकून राहिलेली स्त्री. ती एक प्रकारची गुलामच बनून राहिलेली असते. पण ति जशी स्वतःचे अस्तित्व विसरून राहिलेली असते त्याप्रमाणेच ती, गुलाम आहे. हि गोष्ट ती पूर्णपणे नाकारते आहे. गुलामीच्या या जोखडाला भिरकावून देऊन ती ताठ मानेने नवी दिशा शोधण्याचा प्रयत्न करते.

मात्र एखाद्या स्त्रीने केलेले हे बंड सर्वच स्त्रीया करतील हे खरे नाही. आणि यांच घुसमटत राहिलेल्या स्त्रीया, बंड करणाऱ्या या स्त्रियांना त्या घराबाहेरच पहात राहतात.

धास्तावलेले त्यांचे पति, घुटमटत, रेंगाळत, घरातच चोरट्यासारखे फिरत राहतात. मग रिकामी घर ते डोक्यावर घेतात.

अशा प्रकारे कवींनी कवयित्रीने स्त्रीयांना जिवनातील संघर्षाची तडजोड करायला लागणाऱ्या गोष्टी मांडल्या आहेत.

# "माझंच"

कवयीत्रीनी 'माझंच' या कवितेमध्ये एका लहान मुलीची आणि बाहुलीची उपमा देऊन संवाद मांडण्याचा प्रयत्न केला आहे. कवितेत एका मुलीसाठी बाहुली आणली अस आहे. ती बाहुली तोंडातून बूच काढताच ती रडू लागते. कळवळून टाकणाऱ्या आवाजात ती रडती आहे.

बाहुलीच्या छातीत असणारे सेल संपेपर्यंत लाईट पेटते आणि ~~आणी~~ आवाजही ~~[illegible]~~ येतच राहतो.

जेव्हा घरात कुणी नसतं तेव्हा ती लहान मुलगी त्या बाहुलीला तळहातात घेऊन, तीचे लाड करते आणि तिला गोंजारत बसते. आणि तिच्या तोंडातलं बूच काढून ऐकत राहते तिचं रडणं. तिचं स्वतःच (म्हणजेच स्त्रीचं रडणं) असल्यासारखं ऐकत बसते.

# "निष्कर्ष"

'तत्पुरुष' हा कविता महाजन यांचा पहिलाच कवितासंग्रह आहे. त्यांच्या कविता सर्वसामान्य कुटुंबातल्या दैनंदिन जगण्यातले तपशील थेट मं'भाषेत मांडत असतानाच विराट सामाजिक वास्तवाला नकळत आणि सहजपणे कवेत घेतात. अनुभव घेण्याच्या तीव्रतर आवेगामुळे त्या कडवट उपहाससुद्धा आपलासा करतात, परंतु जगण्याला पोषक असणाऱ्या पर्यायांच्या अभावातही जगण्यावरची श्रद्धा, ढळू न दिल्यामुळे त्यांना भक्कम आस्तित्व लाभते. या कवितांमधील सरवी सर्वपरिचित असलेल्या बाबींना सर्जनाचा विलक्षण स्पर्श लाभल्यामुळे अनपेक्षित काव्यात्म उंची प्राप्त होते.

'तत् तत्पुरुष' हे या कवितासंग्रहाचे नावही अतिशय बोलके आहे. आपल्या समाजातील स्त्री-पुरुष संबंधाचे अनेक पातळ्यांवरचे व्याकरण 'तत्पुरुष' या शब्दातून व्यक्त झालेले आहे. ~~वस्तुतः~~ वस्तुतः या समाजात स्त्री-पुरुष संबंधातील द्वंद्व समास सर्जनशील न होता दुर्दैवाने तत्पुरुषी होतो, त्यामुळे पुरुष हे दुसरे पद आपले वर्चस्व कायम ठेवत असल्याचेच सूचित होते.

आस्तित्वाच्या जीवघेण्या खेळात त्यांची कविता जगण्याच्या असोशीची भुई कधीही सोडत नाही. म्हणूनच हा कवितासंग्रह समकालीन वर्तुळात आपले वेगळे अक्षर उमटवणारा झाला आहे.

ndaram®
FOR EDUCATIONAL USE

# "आभार प्रदर्शन"

या प्रकल्पअहवालासाठि मी कवयित्री - कविता महाजन यांचा काव्यसंग्रह 'तत्पुरुष' हा निवडला असून. यासाठी मला मराठी विषय प्राध्यापक श्री. विवेक कुडू सर यांनी मार्गदर्शन केले. तसेच काही मित्रांची मदत घेतली सर्वांचे खुप खुप आभार.

महाविद्यालयाचे नाव :- सोनोपंत दांडेकर शिक्षण मंडळी, पालघर

विद्यार्थ्याचे नाव :- मुकेश अभानसिंग चव्हाण

विषय :- मराठी - ६ :- साहित्य आणि समाज भाग - 2

प्रकल्पाचे नाव :- मरण स्वस्त होत आहे (दलित साहित्य)

वर्ग :- TYBA (तृतीय वर्ष, कला)

हजेरी क्र :- 658

शैक्षणिक वर्ष :- 2022 - 2023 सत्र V

मार्गदर्शक :- प्रा. विवेक कुडू सर

18/20

FOR EDUCATIONAL USE

# अनुक्रमणिका


| अ.क्र | विषयाचे नाव |
|---|---|
| १ | प्रस्तावना |
| २ | दलित साहित्य |
| ३ | लेखकाची माहिती |
| ४ | पुस्तकातील आशय |
| | i) स्त्री व्यक्ती चित्रण |
| | ii) ग्रामीण जीवनातील स्त्रीचे दुःख |
| | iii) शहरी भागातील स्त्रीचित्रण |
| | iv) दारिद्र्यामुळे भोगावे लागणारे दुःख |
| | v) नियतीमुळे निर्माण होणारे दुःख |
| ५ | समारोप |
| ६ | संदर्भ सूची |


FOR EDUCATIONAL USE

# प्रस्तावना

"बाबुरावांनी आपल्या निरीक्षणातून आणि प्रतिभेतून... कंगालच्या दैनंदिन जीवन-संघर्षातल्या हिंस्त्र आणि हिंस्त्र स्वार्थाच्या वेध घेतला. मानवाच्या पाशवीकरणाच्या अत्यंत गतिमान, चित्रमयी शैलीतल्या कथांच्या हे बाबुरावांच्या कथांचे वैशिष्ट्य यथार्थ चित्रणाचे असामान्य नमूने त्यात आढळतात. मनोरंजन हा बाबुरावांच्या लेखनाचा कधीच उद्देश नव्हता आणि निव्वळ रूपनेच्या खेळात रमणाऱ्या आकृतिवादाचेही त्यांना आकर्षण नव्हते.

"बाबुरावांनी आंबेडकरी विचाराशी बांधिलकी कधीच सोडली नाही तर कलात्मक परिप्रेक्ष्य म्हणून घिच्या प्रगल्भ आणि सजग स्पर्श निरंतर टिकवला. गावातल्या मुरळ्या, शहरातल्या वेश्या, बेकार माणसे, बेवारशी माणसे मनुष्यांच्या पानकीशामध्ये जीवन जगतांना अपरिहार्यपणे पाशवी बनलेली माणसे हे बाबुरावांच्या कथा वाङ्मयातले मानवतेचे दर्शन. अन्यत्र कलात्मतेने फुलवल्या जाणाऱ्या मानवी भावना बाबुरावांच्या साहित्यात वांझ, नकारात्मक रूप धारण करतात. वाचकाला फुरक घालण्यासाठी नव्हे तर त्याला भानावर आणण्यासाठी ते लिहितात.

# दलित साहित्य :-

दलित साहित्याच्या मुळाशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य, विचार व तत्वज्ञान आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी जे विविध लढे दिले, ज्यात महाडचा सत्याग्रह काळाराम मंदिराचा सत्याग्रह, बहिष्कृत भारतमधील लिखाण, राज्यघटनेचे लिखाण यामुळे दलित समाजामध्ये लढवय्येपणा निर्माण झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शुद्रादी शुद्रांना या स्थितीतून बाहेर आणण्यासाठी लढा दिला. त्यांनी दलित वर्गांना शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा असा मोलाचा संदेश दिला. फ्रेंच राज्यक्रांतीतील स्वातंत्र्य, समता, बंधुता, या मुल्यांवर आधारित समाज रचना अस्तित्वात यावी यासाठी प्रयत्न केले. या अगोदर महात्मा ज्योतिराव फुले यांनी समाज संघटित करण्याचा प्रयत्न केला होता.

"बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांची जाणीवपूर्वक जागृती करण्याची क्रांती केली. त्यांनी स्थापन केलेल्या महाविद्यालयातून बाहेर पडलेल्या पहिल्या पिढीने "सिद्धार्थ साहित्य संघ" स्थापन केला. यातून पुढे १९५३ साली महाराष्ट्रात दलित संघाची स्थापना झाली. १९५३ मध्येच दलित साहित्य हा शब्दप्रयोग वापरलेला आढळतो. भारतातील सांस्कृतिक सामाजिक क्षेत्रात ज्यांच्या वाटेला वंचित अपेक्षित अवमानास्पद आणि जुलमांचे जगणे आले त्या जाती, वर्ग गट या सर्वातील लोकांना दलित म्हणता येईल. आणि त्यांच्या जीवनाचे चित्रण करणाऱ्या साहित्याला दलित साहित्य म्हणतात.

FOR EDUCATIONAL USE

व्याख्या :-

① दलित साहित्य म्हणजे दलितांनी दलितविषयी प्रक्षोभक विद्रोह साहित्य.

② माणसाचे मुक्तीचा प्रसार करणारे, माणसाला महान मानणारे, वंश परंपरा आणि जातीश्रेष्ठता यांना विरोध करणारे जे साहित्य आहे ते दलित साहित्य होय.

* दलित साहित्याच्या प्रेरणा :-

दलित चळवळ आणि दलित गौतम बुद्ध, महात्मा फुले आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रति आदर व्यक्त करते. कारण शोषणावर आधारलेल्या व्यवस्थेच्या विरुद्ध विद्रोह करण्याचे कार्य या महापुरुषांनी केले आहे. माणसाला महान मानणारी त्यांची विचारधारा आहे. शोषण व्यवस्थेवर प्रहार करण्याचे त्यांचे कार्य आहे. भगवान बुद्धांनी माणूस केंद्रस्थान मानून जातिभेद व अस्पृश्यता यांचा धिक्कार केला. बुद्धाचे तत्त्वज्ञान समता, ज्ञान, नीतिमत्ता या सामाजिक मूल्यावर उभे आहे. दलित साहित्यही हेच मुल्य मानते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःच बौद्ध धर्माचा स्वीकार केला. म्हणून बुद्ध व बुद्धाचे तत्त्वज्ञान ही दलित साहित्याची प्रेरणा ठरते.

## * दलित साहित्याची वैशिष्ट्ये

### १) वेदना-

भारतीय समाज व्यवस्थेने दलित माणसाला माणूस म्हणून वागविले नाही. शतकानुशतके त्यांचे शोषण करून पशूपेक्षाही हिन वागणूक दिली. गावकुसाबाहेरील बहिष्कृत जिणे जगायला भाग पाडले. धर्मावर आधारलेल्या परंपरागत व्यवस्थेने माणूसपण नाकारले त्याची वेदना दलित साहित्यातून व्यक्त होते. उदा. दया पवार आपल्या एका कवितेत म्हणतात.

-: हे झाड साऱ्या शहरात कोठून गेलेले
धमनीधमनीत फूटू पाहणाऱ्या यातना
दुःखाने गदगदताना हे झाड मी पाहिले

### २) विद्रोह

दलित साहित्याने विद्रोही भूमिका स्वीकारलेली आहे. ज्यांना ज्यांनी दलितांचे शोषण केले; द्रोह केला तो हाणून पाडण्यासाठी विद्रोहाचा जन्म झाला. आज, विनत्या आणि सत्याग्रह करूनही दलित बांधवांना समानतेचा हक्क मिळाला नाही, अशावेळी आक्रमक झाल्याशिवाय पर्याय नाही, ठोठावल्याशिवाय दरवाजे उघडत नाहीत. धर्म, रुढी, परंपरा, संस्कृती इत्यादींना प्रथम छेद मारून त्या आधारे गुलामाला पाठिंबा देणे.

FOR EDUCATIONAL USE

३) नकार :-

दलितांच्या आत्मसन्मानाच्या मार्गात ज्या ज्या गोष्टी अडसर ठरतात त्या सर्वांना नकार दिला पाहिजे हा भाव यामागे आहे. दलित साहित्याने धर्माधिष्ठित रूढी-परंपरा यांच्या प्रभावाखाली असलेल्या सामाजिक व्यवस्थेला नकार दिला पाहिजे विषमता, गुलामगिरी, जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, धर्मसत्ता, शोषण या सर्वांना नकार दिला पाहिजे. असे दलित साहित्याचे सूत्र आहे.

४) आत्मभान :-

वर्षानुवर्षे ज्यांना माणूस म्हणून अस्तित्व नव्हते त्यांना माणूस म्हणून प्रतिष्ठा देण्याचे कार्य, आत्मसन्मानाने जगण्याचे बळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले. त्यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा हा संदेश दिला. यातून दलित तरुणांना आत्मसन्मानाची संघर्ष करताना दिसतो.

५) विज्ञाननिष्ठा

दलित चळवळ साहित्य धर्म या संकल्पनेकडे बुद्धीनिष्ठ दृष्टीने पाहते. ईश्वर संकल्पना नकार देते. आंबेडकरांनी मांडलेली विचारसरणी ही मानवी मूल्यांवर आधारलेली आहे. बुद्धतत्त्वज्ञानाची त्याला जोड आहे. म्हणून त्यात ईश्वर, आत्मा या संकल्पना नाकारल्या गेल्या. कर्मकांड यांना नकारले आणि विज्ञाननिष्ठेला स्वीकारले.

## दलित साहित्याची वाटचाल

दलित साहित्यामध्ये कविता हा अत्यंत प्रभावी ठरलेला साहित्यप्रकार आहे. हजारो वर्षांपासून दलित मनाच्या झालेला कोंडवारा कवितेमधून स्फोट होऊन प्रकट झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चालवलेल्या नियत-कालिकातुन ही कविता प्रारंभी डोकावताना दिसते. नामदेव ढसाळ, दया पवार, अर्जुन डांगळे, ज. वि. पवार, वामन निंबाळकर, प्रल्हाद चेंदवणकर, केशव मेश्राम, यशवंत मनमोहन इत्यादी कविंनी दलित कवितेला समृध्दता प्राप्त करून दिली. अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबुराव बागुल यांनी दलित कथेला यशोशिखरावर नेले. दलित साहित्यामध्ये दलित आत्मकथनांनी आपला स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटवलेला दिसतो. अन्याय आणि अत्याचाराने भरडून निघालेल्या दलितांचे जीवन आत्मकथनातून येते. हा वास्तवदर्शी साहित्यप्रकार आहे. या आत्मकथनांनी मराठी साहित्यालाही धक्के दिले.

दया पवार यांचं बलुतं, प्र. ई. सोनकांबळे यांचे आठवणींचे पक्षी, लक्ष्मण माने यांचे उपरा, लक्ष्मण गायकवाड यांचे उचल्या, किशोर शांताबाई काळे यांचे कोल्हाट्याचं पोर ही आत्मकथन आहे. प्रभावी ठरलेली दिसुन येतात. महाराष्ट्रातल्या विविध भागातुन आलेले हे लेखक असल्याने विविध बोलीभाषा विविध जाती समूहांचे जीवन आणि त्यांची लोकसंस्कृती यांचे आत्मकथनातून दर्शन घडते.

१९६० नंतर उदयास आलेल्या दलित साहित्याने वैश्विक स्तरावर आपले महत्व सिध्द केले. दलित साहित्याने दलितांच्या व्यथा वेदनांना दुःखांचा आवाज जनतेसमोर

मांडला. या साहित्याला बुद्ध, फुले, आंबेडकर यांची प्रेरणा आहे. नकार आणि विद्रोह या दलित साहित्यातल्या महत्त्वपूर्ण भूमिका मराठी साहित्यामध्ये रुजल्या आहेत. दलित साहित्याची निर्मिती ही दुःख आणि वेदना भोगणाऱ्या समाजाच्या उत्स्फूर्त आविष्कार आहे.

# :- बाबुराव बागुल यांचा जीवन परिचय -:

बाबूराव बागुल जुलै १७, १९३० रोजी महाराष्ट्राच्या नाशीक जिल्ह्यातील 'विहितगाव' नावाच्या खेड्यात जन्मले. दलित जातीत जन्मल्यामुळे जातीय विषमतेचे अनुभव त्यांनी लहानपासुनच घेतले. बागुलांच्या आधीची भावंड जगली नाहीत तेव्हा ते तरी जगावेत या विचाराने बागुलांच्या वडिलांनी त्यांनी मुंबईला माटुंग्याच्या लेबर कँपात राहणाऱ्या मावशीकडे पाठवून दिले. तेथील महानगरपालिकेच्या शाळेतच ते शिकू लागले. त्या सुमारास वाढू लागलेल्या आंबेडकरवादी विचारांच्या परिणाम शालेय वयात असलेल्या बागुलावर त्यादरम्यान मुंबईत बळावू लागलेल्या कामगार चळवळीचा प्रभाव पडला. माटुंग्याच्या लेबर कँपातच राहत असलेल्या अण्णा भाऊ साठेंच्या संपर्कातून ते कामगार चळवळीत सहभागी झाले. या काळात त्यांनी साम्यवादी विचारवंत्यांच्या साहित्याचा अभ्यास केला. बेरोजगारी, आर्थिक-सामाजिक विषमता यांविरुद्ध या कालखंडात त्यांनी रचलेल्या कवितांमधून या विचारांचा प्रभाव जाणवतो.

१९५५ मध्ये रेल्वे वर्कशॉपात नोकरी मिळाल्यामुळे बागुल सुरतेस गेले. तेथे त्यांना जातीय भेदभावामुळे भाड्याने घर मिळत नव्हते. तेव्हा त्यांनी जात चोरुन भाड्याचे घर घेतले. परंतु जात चोरून असे राहणे न रुचल्यामुळे नोकरी सोडून ते मुंबईस परतले. सुरतेतील त्या अनुभवांवर त्यांनी 'जेव्हा मी जात चोरली होती' ही कथा लिहिली.

१९५७ मध्ये प्रथमच त्यांची कथा आचार्य अत्रेंच्या 'नवयुग' नियतकालिकातून प्रकाशित झाली. पुढील काळात 'नवयुग' व युगांतर या नियतकालिकातुन त्यांच्या कथा एकामागोमाग एक प्रकाशित होऊ लागल्या. प्रस्थापित समाजव्यवस्थेतील दोषांचे दर्शन घडवणाऱ्या त्यांच्या कथा १९६३ साली 'जेव्हा मी जात चोरली होती' या कथासंग्रहाच्या रूपाने प्रकाशित झाल्या. नंतर १९६९ सालात 'मरण स्वस्त होत आहे' हा कथाग्रंथ प्रकाशित झाला. 'अघोरी', 'कोंडी', 'पावशा', 'सरदार', 'भूमिहीन', 'मूकनायक', 'अपूर्वा', अशा कथा-कादंबऱ्यांनी मराठी साहित्यात नवा प्रवाह आणला. बागुलांच्या लेखनामुळे प्रभावित होऊन लिहित्या झालेल्या दलित वर्गातील लेखकांच्या लिखाणातून मराठी साहित्यात दलित साहित्याची नवी वाट आली. मार्च २६, २००८ रोजी बागुलांचे नाशकात निधन झाले.

## सन्मान व पुरस्कार :-

- धारावी (मुंबई), येथे ७ फेब्रुवारी १९८८ रोजी भरलेल्या पहिल्या विद्रोही साहित्य संमेलनाचे, अध्यक्षपद, उद्घाटनाचे भाषण डा. आ. ह. साळुंखे यांनी केले होते.
- बाबुलांच्या साहित्यीक कार्याचा गौरव म्हणून कविवर्य कुसुमाग्रज प्रतिष्ठानच्या 'जनस्थान पुरस्कार' २००७ साली त्यांना देण्यात आला.
- महासत्र फाउंडेशन पुरस्कार
- जनस्थान पुरस्कार

## प्रकाशीत साहित्य :-

कादंबरी

- अघोरी (1983)
- अपूर्वा
- कोंडी (2002)
- पावशा (1971)
- भूमिहीन
- मूकनायक
- सरदार
- सूड

## कथासंग्रह :-

- जेव्हा मी जात चोरली होती (१९६३)
- मरण स्वस्त होत आहे (१९६९)

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

कवितासंग्रह :-

- वेदाआधी तू होता

वैचारिक :-

- आंबेडकर भारत
- दलित साहित्य : आजचे क्रांती विज्ञान

# बागुलांच्या कथेतील स्त्री व्यक्ति चित्रण

बाबुराव बागुल यांच्या "मरण स्वस्त होत आहे" या दोन कथासंग्रहात ग्रामिण भागातील दलित जीवनाचे दर्शन घडते. त्याचबरोबर नगर भागातील झोपड-पट्टीचे ही दर्शन घडते. "विद्रोह" या कथेतील 'जय' ची आई म्युनिसीपालिटीत काम करणारी स्त्री आहे. घरी खाणारी चार-पाच माणसे आहेत. घरात अठराविश्व दारिद्र्य आहे. त्यामुळे तिला भंगीकाम करावे लागले. तिचा नवरा मरायला टेकला आहे. "जय" च्या आई-वडिलांनी त्याला अर्धवट शिक्षण सोडून भंग्याची नोकरी करण्यास सांगितले. जयला हे पसंत नाही. त्याने त्याविरुद्ध तक्रार केली. त्याने आलेली भंग्यांची नोकरी नाकारली. जयची पत्नी शांती सोळा-सतरा वर्षांची असून मनातल्या मनात त्याने शिक्षण सोडून नोकरीचा स्विकार करावा, संसार सांभाळावा असे तळमळ होती. पण तिचे मनोव्यथा फक्त सास-ऱ्याला जाणवत होती. तो म्हणाला,

"जय ! तुला आपल्या घरातील दैन्य, दारिद्र्य, तुझ्या आईचे हाल दिसत नाहीत? तुझ्या बायकोचे निःश्वास तुला ऐकू येत नाहीत...."

या कथेतून जयचा विद्रोह पानापानावर व्यक्त झालेला आढळतो. त्याचबरोबर जयची आई भाबी व पत्नी शांता यांच्या मनाच्या अवस्थेचे सुंदर वर्णन केलेले दिसते.

भारतीय स्त्रीवर पुरुष सत्ताक कुटुंब पद्धती-
त्या कसा अन्याय होतो याचे वर्णन व सावित्री सारखी
साध्वी असणाऱ्या स्त्रीचा कसा छळ होतो याचेही चित्रण
"पेसुक" या कथामध्ये आले आहे. दलित स्त्री म्हणजे तुच्छ
त्यामुळे त्त तिच्या वाट्याला किती भीषण जिणे येते याचे
प्रत्यंतर येतेच. शिवाय पुरुष श्रेष्ठ व स्त्री कनिष्ठ ही
भावना सगळ्या समाजात असते. त्यामुळे या कनिष्ठ
समजल्या जाणाऱ्या स्त्रियांच्या वाट्याला दु:ख निराशाच
अधिक येते. अशी या सावित्रीची कथा आहे.

"पेसुक" या कथेत वर्णन केल्याप्रमाणे सावित्री
आई व्हावी म्हणून जयदेवाची प्रयत्नांची पराकाष्ठा चालत होती
जयदेव रडत होता आणि शेवटी तो मरायला निघाला. भारती-
य स्त्री सर्व सहन करू शकते, पण विधवा होणे सहन करणार
नाही. कारण ती एक भयंकर शिक्षा आहे. म्हणून सावित्री
पुरुषगमनास तयार होऊन आई झाली. जयदेवाचे षंढत्व
सिद्ध होताच तो तिचा व मुलाचा तिरस्कार करू लागला.
याचाच परिणाम असा झाला की हे रहस्य सगळीकडे
पसरले. तिची विटंबना झाली त्यामुळे ती वेडी झाली.

एक स्त्री दुसऱ्या स्त्रीच्या दु:खाला कशी कारणीभूत
ठरते हे "वानर" या कथेत पहावयाला मिळते. पुरुषाक-
डून तर स्त्रीचा छळ होतोच. शिवाय स्त्रियांकडून विविध
कारणा- नी स्त्रीचा छळ होतो याचे चित्रण या कथेत
आले आहे. सखूच्या नवरा बापू पहलवान आहे. त्याचा
ासुरवाडीच्या पहलवानाने पराभव केला होता. त्याने
्याच्या भर फडात संतापाने विजयी पैलवानासहित तीन
डी पाडण्याची प्रतिज्ञा केली होती. जत्रेतील पराभवाचा-
ंतर तो व त्याची आई मयूरी शत्रूप्रमाणे वागत होते.

FOR EDUCATIONAL USE

2) ग्रामीण जीवनातील स्त्रीचे दुःख :-

बाबुराव बागूल यांच्या कथासंग्रहामध्ये ग्रामीण व दलित स्त्रीचे चित्रण आले आहे. बागूल या स्त्रियांचे चित्रण करत असताना अस्पृश्याबरोबरच ग्रामीण जीवनात रुढी, परंपरा, कल्पना, श्रद्धा, अंधश्रद्धा यांनाही मानणारी असते. पण ह्याच गोष्टी तिच्या दुःखाला, नाशाला कशा कारणीभूत ठरतात याचे प्रत्यंतर त्यांच्या कथेत वरचेवर येते. त्यामुळे त्यांच्या दुःखाला पारावरच राहत नाही. दलितांच्या दुःखाचे मूळ विषमतेवर आधारलेल्या अन्याय समाजव्यवस्थेत व मानवी स्वभावात असते. दलित जीवनाच्या विविधांगांनी वेध घेताना सवर्णांनी दलितांवर केलेले अन्याय, अस्पृश्यतेचा परिणाम म्हणून वाट्याला आलेले दारिद्र्य आणि मानवी स्वभाव व वर्तन या सर्वांमुळे भोगावे लागणारे दुःख अशा दलित जीवनातील दुःखाची मीमांसा बाबुराव बागुल आपल्या कथांतून करतात.

'काळोखाचे कैदी' या कथेतील "बानू" अस्पृश्य समाजातील एका गरिबाची मुलगी आहे. खंडोबाच्या मागून आली म्हणून तिचे बानू ठेवण्यात आले. आणि नवस फेडण्याच्या सामाजिक रुढी, परंपरेतून तिला मुरळी म्हणून सोडण्यात आले. बानूच्या वडिलांना आपल्या सुंदर मुलीचा नवस होऊ नये असे वाटत होते. पण तिच्या सौंदर्याची कथा ऐकून रामराव धन आणि वचन देऊन तिला आपल्या घरी घेऊन येतो. तिचे वागणे रामरावशी चांगले होते. एखाद्या घरंदाज स्त्रीच्या जातीला शोभेल असेच होते.

## शहरी भागातील स्त्री चित्रण :-

शहरी आणि नागरी भागातील वास्तव जीवनाचे चित्रण करण्यात बाबुराव बागूल अग्रेसर आहेत. ते ज्याप्रमाणे ग्रामीण भागातील जीवनाचे समर्थपणे वर्णन करतात त्याप्रमाणे ते शहरी जीवनाचे ही वर्णन तितक्याच सामर्थ्याने करतात. शहरी झोपडपट्टीचे वर्णन प्रामुख्याने त्यांच्या "मरण स्वस्त होत आहे" या कथासंग्रहात आढळते. यात झोपडपट्टीतील भयानक, विभत्स जीवनाची ओळख येते. झोपडपट्टीत जीवन जगणाऱ्या स्त्रिया व त्यांच्या वाट्याला आलेले दारिद्र्य यावर बागूलांनी वास्तव व प्रभावी चित्रण केले आहे. बाबुराव बागूल हे लहानाचे मोठे खेड्यातच झाले. त्यामुळे तेथील जीवन त्यांनी अनुभवलेले आहे. त्यावेळच्या परिस्थितीचा अनुभव घेतला आहे. खेड्यातील दुःख, दारिद्र्य, दैन्य याचे अनुभव काही त्यांना नवीन नाहीत. अगतिक होऊन या लोकांना शेती सोडून शहरात यावे लागले. बागुलांनी आपल्या मावशीबरोबर मुंबईला यावे लागले. शहरात येऊन झोपडपट्टीत राहणाऱ्या माणसांच्या आयुष्याची शान-शून्यता हीच त्यांच्या गळ्यात फास ठरली. संवेदनहीन जीवन जगण्याचा सराव पडला. मग पशु पातळीवर जीवन जगताना लाज वाटेनाशी झाली.

"मरण स्वस्त होत आहे" या कथेत झोपडपट्टीतील माणसे कुत्र्या-मांजरासारखे जीवन जगणारी आहेत. ही कथा वेगवेगळ्या कृत्यातून उभारलेली आहे. यातील प्रत्येक दृश्य स्वातंत्र्य आहे. या सर्व दृश्याचा परिणाम म्हणजे " या मुंबईत माणसाला माणूस खातो असं, येथे "मरण स्वस्त होत आहे." याची जाणिव होते. होते.

बापू पहेलवान कामक्रोधाने पछाडलेला असतानाच सखू शकदा मळ्याकडे आली. मुळातच सखू दिसायला सुंदर, [मादक] होती तिला मळ्याकडे येण्यास आज तिला संधी मिळाली होती. कारण सासू सकाळीच भगताकडे गेली होती व बापूजी भोजनवेळ टळून गेली तरी ती आली नव्हती. म्हणून सखू त्याची जेवण घेऊन आली. तिला मळ्यात जाण्याची परवानगी नव्हती. म्हणून सखू त्याचे जेवण घेऊन आली. तिला मळ्यात जाण्याची परवानगी नसून ती हुकूम मोडून ती आली होती.

सखूला पाहून त्याच्या मनात जीवघेणा क्रोध निर्माण झाला व तो कामांधाने बेभान झाला. तिला वर उचलून खाली आपटून ठार करायचे होते पण तेवढ्यात डोक्यावर गाठोडे घेऊन त्याची आई आली. संपूर्ण हकीगत पाहून त्याची आई चिडली व निर्दोष सुनेला दोषी ठरवले. यातूनच एक स्त्री दुसऱ्या स्त्रीला प्रतिष्ठेसाठी मान-मरातबासाठी कसे दुःख देते याचे वर्णन या कथेत आले आहे.

"[भुटाइट]" या कथेतील वंचाळ, पुतळी, सोना या वेश्या आहेत. त्यांच्या जीवनाची दुर्दशा झालेली आढळते हे सर्व पाहून आपले मन खिन्न होते. त्यांच्याविषयी आपोआप सहानुभूती निर्माण होते. या सर्व वेश्यांना छळणारी "गंगू" ही कुंटीण आहे. पण तिच्याबद्दल चीड येत नाही. उलट मनात करुणा निर्माण होते. कारण ती आपल्या जीवनाची कथा तेथील वंचाळ [वेशीला] सांगते. ती म्हणते माझी काही चूक नसताना माझ्या नवऱ्याने मला घेऊन मुंबई-ला पैसे मिळवण्यासाठी आला. पैसा काही मिळेना, मुंबईत काही करमेना, तो मला नेहमीच मारायचा त्याच्यामुळे माझी जमीन गेली असे म्हणायचा. शेवटी मला बडीकडे ठेऊन काही जाऊन येतो म्हणून जो गेला तो परत आलाच नाही.

# समारोप -

दलित साहित्याने मराठी व एकूणच भारतीय साहित्यामध्ये वास्तववादी साहित्याचा एक जोरकस असा प्रवाह निर्माण केला. हजारो वर्षांपासून ज्यांचे शोषण होत होते, अशा समाजातून पुढे आलेले लेखक, कवी कथा कविता, आत्मकथन इ. साहित्यप्रकारातून आपल्या भावनांना वाट मोकळी करून पाहू लागले. साहित्यातून अन्याय, अत्याचार, शोषण, विषमता इ. विरुद्ध आवाज उठवू लागले. स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवतावाद इ. मूल्यांशी बांधीलकी सांगू लागले. या साहित्याने मराठी साहित्याला आशय, अभिव्यक्ती व भाषा अशा सर्व अंगांनी समृद्ध केले आहे.

## • संदर्भ सूची •


बाबुराव बागूल, बा. ल. पाठक प्रकाशक, मुंबई, प्र. आ. 1969,


FOR EDUCATIONAL USE

शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३

सेमेस्टर - VI Paper NO - IX

नाव - स्वरांजली अनिल पाटील.

महाविद्यालयाचे नाव - सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, पालघर

इयत्ता - तृतीय वर्ष कला (अ)

हजेरी क्र. - ६०१

विषय - व्यावसायिक मराठी

19/20

FOR EDUCATIONAL USE

# ब्लॉग लेखन

## १. महाविद्यालयातील पहिला दिवस

शाळा संपून महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करणे म्हणजे जणू एका विश्वातून दुसऱ्या विश्वात जाण्यासारखे असते. कानी कपाळी 'आता तुम्ही मोठे झालात. जबाबदारीने वागा' अशा सूचना मिळत असतात. बालपण संपल्याची हुरहूर तर तारुण्याची चाहूल लागण्याची उत्सुकता अशा संमिश्र भावनेने मन भरून गेलेले असते माझ्याही मनाची अशीच अवस्था असताना मी महाविद्यालयात प्रवेश केला.

सुदैवाने दहावीत गुण चांगले मिळाले असल्याने मनासारखे महाविद्यालय मिळाले होते. गणवेशाची कटकट नसल्याने छानपैकी मॉडर्न स्टाईलची जीन्स आणि टी-शर्ट घालून महाविद्यालयात प्रवेश केला. प्रवेशद्वाराजवळ सुरक्षारक्षकाने अडवले. अजून ओळखपत्र नसल्याने रिसिट दाखवून प्रवेश केला. वीस्तीर्ण पसरलेली इमारत बघून मन दडपून गेलं. त्याभोवती छान हिरवळ असलेला बगीचा होता. फुलांचे ताटवे डोलत होते. फुलांसारखीच गोड मुले-मुली गप्पा मारत इकडे-तिकडे बागडत होते. मी कोणालाच ओळखत नव्हतो. त्यामुळे ते सर्व रमणीय दृश्य मनात साठवतच इमारतीच्या आत शिरलो. माझी रिसिट पाहून तिथल्या एका शिक्षकाने मला माझा वर्ग दाखवला. मी मुकाट वर्गात जाऊन

बसलो. वर्ग भरलेला होता. मग एकेक शिक्षक येत गेले. प्राचार्य आले. त्यांनी महाविद्यालयाची माहिती दिली. नियम समजावून दिले आणि वर्ग सोडून दिला. दोनचार मुला-मुलींशी बोलून मैत्री केली. पण एकुणच पहिला दिवस प्रसन्न गेला. तीच प्रसन्नता घेऊन मी घरी गेलो.

## 2. मागच्या महिन्यातली गोष्ट

मागच्या महिन्यातली गोष्ट. रात्री बेडवरुन मोबाईल खाली पडला. पाहतो तर बंदच पडला. चार्जिंगही होईना. रात्र तशीच तळमळत काढली कशीबशी.

दुसऱ्या दिवशी पहाटे ८ वाजता उठून तात्काळ गुजरात कॉलनीत गेलो. मोबाईल दुरुस्त करणारा सद्-गृहस्थ म्हणाला, मोबाइल इथंच ठेवून जा, एक दोन दिवसात होईल रिपेअर मनात म्हटलं, ऑलरेडी एक रात्र अशीच मोबाईलविना काढली आहे आता अजून दोन दिवस! कल्पनेने अंगावर काटा आला.

दुसऱ्या रिपेअरच्या दुकानात गेलो. तिथं विशीतला एक मुलगा होता. त्याला सांगितल काय झालं आहे ते. पठ्ठ्यान फोन खोलला आणि काहीतरी खटपट करुन दुसऱ्या मिनिटाला सुरु केला. माझ्या जीवात जीव आला. म्हंटल किती झाले?

"नको राहूदया. विशेष काही नव्हता झालं. आतलं चार्जिंग कनेक्शन लूज झालं होतं." मी म्हटलं, "असं नको करु, जे काही असेल ते सांग." मग तो म्हणाला

५० रुपये". मी म्हटल्यामुळे त्यानं अगदी बळेच ५० रुपये सांगितले. गुगल पे डाऊन होत आणि कॅशमध्ये थेट पाचशेची नोट होती. त्याच्याकडे सुट्टे नव्हते. शेजारच्या दुकानात शंभरच्या पाच नोटा मिळवून आलो आणि त्याला १०० रु दिले तर तो म्हणे, अहो ५० पण नाहीत माझ्याकडं परत द्यायला.

मी म्हटलं, मी तुला शंभरच देतो आहे. एवढ्या एका प्राब्लेमसाठी कोणीही मला सहज गंडवून मार्‍याकडून पाचशेक रुपये सहज उकळले असते. तु प्रामाणिकपणे पैसे सांगितले आणि सुरुवातीला घेतचं नव्हाता त्यामुळे हे ठेव.

तो हसला आणि म्हणाला, "भवानी झाली" "भवानी तर माझी झाली", मी म्हणालो. सकाळी सकाळी ग्राहकाला बकरी न बनवणारा माणूस भेटला. असे चांगुलपणाचे, प्रामाणिकपणाचे अंश असलेली माणसं आहेत तोवर या दुनियेला मरण नाही!

## 3. निसर्ग कोपतो तेव्हा...

निसर्ग मानवाचा सखा आहे. निसर्गाशी एकरुप होऊन त्याच्या सहवासात मानव आपल्या व्यथा विसरतो. मन हलकं प्रफूल्लित करुन घेतो. पण या निसर्गाचा कोप झाला तर एका सेकंदात त्याचे मोहक रुप दाहक होते. क्षणात सारे काही विनाशाच्या खाईत लोटले जाते. असे निसर्गाचे रौद्र रुप कधी महापूर तर कधी अवर्षण आणि कधी भूकंप दुष्काळ वीज पडणे तर कधी उल्का पृथ्वीवर पडणे या स्वरुपातून जेव्हा समोर येते तेव्हा

FOR EDUCATIONAL USE

सर्व हृदयांचा थरकाप होतो. सृष्टीचे स्वरूप पालटते. शेक्सपिअरने म्हटले आहे -

"निसर्ग हा सन्माननीय खलपुरुष आणि कु-साधुपुरुष आहे. कारण तो जसा दिसतो त्याच्या उलट असतो."

निसर्गाचे रौद्र रूप बघितले तर त्याचे रम्य रूप हे त्याचेच का? असा प्रश्न मनाला पडतो. निसर्ग आपल्यासमोर येतो. कधी आनंद तर कधी दुःख घेऊन... मानवी जीवनही असेच आहे.

मुसळधार पावसात विजाचे नर्तन चालू होते. पावसाच्या धारा तीव्रतेने बरसत होत्या. सारी सृष्टी ओलीचिंब झाली होती. रस्त्यावर शुकशुकाट होता. संध्याकाळ निशेच्या भेटीसाठी निघाली होती. बाबांबरोबर मी दिवसभर शेतातच होतो. रविवारची सुट्टी असल्याने शेतात येण्याचा हट्ट मी केला होता. संध्याकाळ झाल्यानंतर आम्ही दोघे मोटारसायकलने घरी परतण्यासाठी निघालो पावसाने जोर घेतला जवळच्या शेतातल्या घरी आम्ही आश्रय घेतला. थोड्याच वेळात ढगांचा गडगडाट व विजांचा लखलखाट असा वाढला की, मी घाबरून बाबांच्या गळ्याला मिठी मारली. आम्ही खिडकीतून बाहेर पाहिले. दुरून दोन व्यक्तीही पळत घराकडे येताना दिसल्या. पाऊस व वीजा यांना घाबरून दोघे जीव मुठीत घेऊन पळत होते. अन् क्षणात सारे संपले विजेचा एक लोळ आकाशातून त्यांच्या अंगावर कोसळला... त्यांच्या देहाची राख झाली. हे सारे पाहून आमचे डोके दगडासारखे थिजले. हृदय रक्तबंबाळ झाले. निसर्गापुढे मानव किती थिटा आहे याची जाणीव झाली. नकळत पापण्यांचे काठ सोडून अश्रूंच्या धारा ओघळल्या.

तो दिवस... तो क्षण... ती स्फूटी... ती राख झालेली शरीरे... निसर्गाचे रौद्र रूप... भयानक होणं सारं इतकं संहारक होऊ शकतं? या आश्चर्याने अजूनही माझी पाठ सोडलेली नाही. किल्लारीचा भूकंप असो कि इतर महापुर, - अवर्षण याद्वारे निसर्गाचा कोप असो मानव मात्र विवश आहे. तो काहीच करू शकत नाही; फक्त प्रार्थनेशिवाय!

"पृथ्वीमाते, अशी पृथक होऊ नकोस जलदेवते, अशी रुसू नकोस अग्निदेवते अशी भडकू नकोस आम्ही तुझी बाळे आहोत!!"

## ४. आत्मविश्वासाने कसे जगावे?

एका बादशहाने एकदा आपल्या वजिराला विचारले, "सर्वात श्रेष्ठ हत्यार कोणते, सांग बरे?" वजिराने उत्तर दिले, "आत्मविश्वास"! बादशहाला ते काही पटेना. त्याने वजिराची परीक्षा पाहण्याचे ठरविले. काही दिवसांनी बादशहाने वजीर निःशस्त्र असताना त्याच्या अंगावर एक माजलेला हत्ती सोडण्यास सांगितले. वजिराने हत्ती येत असताना पाहून रस्त्यावर झोपलेले एक मरतुकडे कुत्रे उचलले. त्याचे पाय गरगरा फिरवून त्याला हत्तीच्या अंगावर फेकून दिली. कुत्रे जाऊन हत्तीच्या सोंडेवर आदळले. त्याचा पंजा व नखे हत्तीला बोचली. त्यामुळे हत्ती उलट्या दिशेने इतक्या जोरात पळाला कि त्याच्यावरचा माहूतसुद्धा क्षणभर

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

घाबरला. बादशहाला जेव्हा हे कळले तेव्हा त्याला वजिराच्या उत्तराची खात्री पटली. वजिराजवळ आत्मविश्वास नसता तर त्याला संकटाला साहसाने तोंड देताच आले नसते. आत्मविश्वासाच्या सामर्थ्यावर अशक्य वाटणाऱ्या गोष्टीही शक्य होतात.

आत्मविश्वास जागृत झाला की मनुष्यातील सर्व सुप्तशक्ती जागृत होतात. "अशक्य हा शब्द फक्त मूर्ख लोकांच्या शब्दकोशात आढळतो" हे नेपोलियन उद्गार आत्मविश्वासाचेच द्योतक आहेत. आत्मविश्वास फार मोठी शक्ती आहे. तिच्या जोरावर असामान्य यश मिळविता येते. केवळ बंदुका लढत नसतात. तर त्यांच्या पाठीमागचे मराठी मन व मनगट लढत असते.

कोलंबस जेव्हा अमेरिका खंडाच्या शोधात निघाला तेव्हा त्याचे सर्व साथीदार कालांतराने परत फिरण्याविषयी बोलू लागले. कोलंबसचा आत्मविश्वास मात्र डळमळला नाही. म्हणूनच तो इतिहासात अजरामर झाला. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होण्यापूर्वी अब्राहम लिंकन ३५ वेळा निवडणूकीत पराभूत झाले होते. पण त्यांचा आत्मविश्वास खचला नव्हता.

"Travellar, there are no paths are made by walking"

आत्मविश्वास थाच धर्तीवर सदा सिद्ध नसतो. तो आत्मसाधनेने जागृत करावा लागतो. म्हणूनच स्वामी विवेकानंद म्हणत- "उत्तिष्ठत, जागृत, प्राप्यवरान्निबोधत!" आत्मविश्वास हे कर्तृत्वाचे महान तत्व आहे.

# ५. वाचाल तर वाचाल!

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी म्हटले आहे की "वाचाल तर वाचाल!"

इतर प्राण्यापेक्षा मनुष्यप्राण्याचा मेंदू अधिक तल्लख आहे. मनुष्य त्यामुळे बोलणे, लिहीणे वाचणे या क्रिया करू शकतो. वाचनाचे महत्त्व अफाट आहे. वाचनाने आपले व्यक्तिमत्व अधिक समृद्ध होते. वाचनाने मनुष्य बहुश्रुत होतो. त्याचे ज्ञान वाढते. वेळ सत्कारणी लागतो, जगात काय चालले आहे याची जाणीव होते. वाचनाचा छंद, चांगली पुस्तके संग्रहित करण्याचा छंद जडतो. करमणूक ही होते. सखोल वाचनाने विषय चांगला समजतो. मनाला प्रसन्नता मिळते. चांगला वाचक चांगला वक्ताही बनू शकतो.

जोसेफ मॅझिनी म्हणतात –

"साहित्य सोनियाच्या खाणी<br>
उघडवी देशियाच्या श्रोणी<br>
विवेक वल्लीची लावणी<br>
हो देही सैन्य ॥"

वाङ्मय साहित्य हे देशोन्नतीचे मुख्य साधन आहे. म्हणून वाचनाचे महत्त्व अगाध आहे. अज्ञान हा तर अधोगतीचा पाया आहे. वाचन हा प्रगतीचा पाया आहे. १९९० हे वर्ष 'निरक्षरता निर्मूलन' म्हणून पाळले गेले.

FOR EDUCATIONAL USE

पुस्तक सांगतात गोष्ट
वाहून गेलेल्या दिवसांची
युगायुगांची, विश्वाची माणसांची
कालची-आजची-उदयाची,
एका एका क्षणाची!...
पुस्तकात असतो क्षेपणास्त्रांचा विध्वंस
काळ्या कृत्यात बुडालेला महाभारतातला कंस
पुस्तकातल्या शब्दांना करुणेची हाक आहे
'सर्वे सन्तु निरामया' विज्ञानाची हाक आहे"

वाचायला सुरुवात करा म्हणजे मग पोहोचाल नेमक्या ठिकाणी... अशी ही पुस्तके संकटमयी खरे मित्र बनून धीर देणे हे कार्य ही पुस्तके करतात. थकलेल मन पुस्तकात हरवतं, दुःख विसरतं. नाउमेद झालेल्या जीवनालाही जगण्याची उभारी पुस्तके देतात. शब्दातून भावना भावनेतून संस्कृती आणि संस्कृतीतून प्रगती अशी वाटचाल वाचनाव्दारे शक्य होईल.

FOR EDUCATIONAL USE

जाहीरात लेखन

६ | लोकसत्ता विविधा WWW.LOKSATTA.COM ★ मुंबई, गुरुवार, ९ फेब्रुवारी २०२३

# आप्पासाहेब धर्माधिकारी यांना 'महाराष्ट्र भूषण'

**लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी**

**अलिबाग :** निरुपणाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणाऱ्या डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना यंदाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार राज्य सरकारने बुधवारी जाहीर केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रेवदंडा येथे या पुरस्काराची घोषणा केली.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मुलाच्या व्रतबंधन सोहळ्यासाठी रेवदंडा येथे आले होते. या सोहळ्यादरम्यान त्यांनी आप्पासाहेब धर्माधिकारी यांना यंदाचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर केला. एकाच कुटुंबातील दोन व्यक्तींना हा पुरस्कार जाहीर होण्याची ही पहिलीच वेळ आहे. याआधी नानासाहेब धर्माधिकारी यांना २००८ मध्ये महाराष्ट्र भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. आता आप्पासाहेबांसाठी पुरस्काराची घोषणा होताच त्यांच्या अनुयायांनी रेवदंडा येथे फटाके फोडून जल्लोष केला.

**आप्पासाहेबांचे सामाजिक कार्य**

आप्पासाहेब धर्माधिकारी यांना समाजप्रबोधनाचे बाळकडू वडील नानासाहेब धर्माधिकारी यांच्याकडून मिळाले. समाजप्रबोधनाला मानवी उत्थानाची जोड देण्याचे काम त्यांनी केले. त्यासाठी नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान स्थापना केले. बाल संस्कारवर्ग, आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, व्यसनमुक्ती, परिसर स्वच्छता, वृक्ष लागवड, पर्यावरण संवर्धन, विहिरी पुनर्भरण, शैक्षणिक साहित्य वाटप यासारखे उपक्रम त्यांनी हाती घेतली. त्यास श्री सदस्यांनी हातभार लावला.

"आप्पासाहेब धर्माधिकारी यांचे कार्य प्रेरणादायी आहे. गेली अनेक वर्षे व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा निर्मूलन, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छता आदी क्षेत्रात त्यांचे काम अव्याहतपणे सुरु आहे. त्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

**- एकनाथ शिंदे**, मुख्यमंत्री

"२००८ मध्ये वडील नानासाहेब धर्माधिकारी यांना हा पुरस्कार जाहीर झाला होता. आता तो मलाही जाहीर झाल्याचा आनंद आहेच. पण, पुरस्कारांबरोबर जबाबदारीही येत असते. त्यामुळेप्रतिष्ठानच्या वतीने सुरु असलेले सामाजिक कार्य व्यापक प्रमाणात पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न राहील.

**-आप्पासाहेब धर्माधिकारी**, ज्येष्ठ निरुपणकार

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

# आप्पासाहेब धर्माधिकारी यांना 'महाराष्ट्र भूषण'

## लोकसत्ता, विशेष प्रतिनिधी

अलिबाग : निरूपणाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करणाऱ्या डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना यंदाचा महाराष्ट्र भुषण पुरस्कार राज्य सरकारने बुधवारी जाहीर केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रेवदंडा येथे या पुरस्काराची घोषणा केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र देवेंद्र फडणवीस हे सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मुलाच्या व्रतबंधन सोहळ्यासाठी रेवदंडा येथे आलो होतो. या सोहळ्यादरम्यान त्यांनी आप्पासाहेब धर्माधिकारी यांना यंदाचा महाराष्ट्र भुषण पुरस्कार जाहीर केला. एकाच कुटूंबातील दोन व्यक्तींना हा पुरस्कार जाहीर होण्याची ही पहिलीच वेळ आहे. याआधी नानासाहेब धर्माधिकारी यांना २००८ मध्ये महाराष्ट्र भुषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. आता आप्पासाहेबांसाठी पुरस्काराची घोषणा होताच त्यांच्या अनुयायांनी रेवदंडा येथे फटाके फोडून जल्लोष केला.

## आप्पासाहेबांचे सामाजिक कार्य

आप्पासाहेब धर्माधिकारी यांना समाजप्रबोधनाचे बाळकडू वडिल नानासाहेब धर्माधिकारी यांच्याकडून मिळाले. समाजप्रबोधनाला मानवी उत्थानाची जोड देण्याचे काम त्यांनी केले. त्यासाठी नानासाहेब धर्माधिकारी

प्रतिष्ठान स्थापन केले. बाल संस्कारवर्ग, आरोग्य शिबीर, रक्तदान शिबीर, व्यसनमुक्ती, परिसर स्वच्छता, वृक्ष लागवड पर्यावरण संवर्धन, विहीरी पुनर्भरण, शैक्षणिक साहित्य वाटप यासारखे उपक्रम त्यांनी हाती घेतले. त्यास श्री सदस्यांनी हातभार लावला.

" आप्पासाहेब धर्माधिकारी यांचे कार्य प्रेरणादायी आहे. गेली अनेक वर्षे व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन आणि स्वच्छता आदि क्षेत्रात त्यांचे काम अव्याहतपणे सुरु आहे. त्याची दखल घेऊन त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

– एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री

" २००८ मध्ये वडील नानासाहेब धर्माधिकारी यांना हा पुरस्कार जाहीर झाला होता. आता तो मलाही जाहीर झाल्याचा आनंद आहेच. पण, पुरस्कारांबरोबर जबाबदारीही येत असते. त्यामुळे प्रतिष्ठानाच्या वतीने सुरु असलेले सामाजिक कार्य व्यापक प्रमाणात पुढे नेण्याचा आमचा प्रयत्न राहील.

– आप्पासाहेब धर्माधिकारी, जेष्ठ निरुपणकार

FOR EDUCATIONAL USE

# गांधी-विनोबांच्या देशात गुन्हेगारांचे उदात्तीकरण!

## श्रीकांत देशमुख यांचा उद्वेग; 'गांधीजी ते विनोबाजी : वर्तमानाच्या परिप्रेक्ष्यातून'वर परिसंवाद



शफी पठाण, लोकसत्ता

**राष्ट्रपिता महात्मा गांधी साहित्य नगरी, वर्धा :** बिल्कीस बानोवर बलात्कार करणाऱ्यांचा जाहीर सत्कार केला जातोय, शेतकरी हा शब्द आत्महत्या असाही लिहिला जाऊ शकतो, इतकी त्यांची अवस्था बिकट आहे. गांधी-विनोबांचा वैचारिक वारसा सांगणाऱ्या या देशात हे घडतेय, याचा अर्थ आज गांधी-विनोबांचे विचार कालबाह्य झाले आहेत, असे परखड प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक श्रीकांत देशमुख यांनी केले. ते आज रविवारी साहित्य संमेलनात आयोजित 'गांधीजी ते विनोबाजी : वर्तमानाच्या परिप्रेक्ष्यातून' या विषयावर परिसंवादात बोलत होते. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी भाजप नेते व राज्यसभेचे सदस्य विनय सहस्रबुद्धे, तर प्रमुख वक्ते म्हणून 'लोकसत्ता'च्या विदर्भ आवृत्तीचे निवासी संपादक देवेंद्र गावंडे, गोव्याचे माजी उपमुख्यमंत्री रमाकांत खलप, डॉ. प्रशांत धर्माधिकारी व भानू काळे हे होते.

यावेळी श्रीकांत देशमुख म्हणाले, गांधी-विनोबांचा सद्भावनेवर विश्वास होता, परंतु २०१४च्या नवीन स्वातंत्र्यानंतर ही सद्भावनाच नष्ट झाली आहे. बोलणाऱ्यांची जीभ छाटली जात असल्याने न बोलणाऱ्यांचीच परंपरा निर्माण होत आहे. कुठल्याही गोष्टीच्या चिकित्सेची परवानगी नाकारली जात आहे, याकडेही त्यांनी आपल्या भाषणातून लक्ष वेधले.

### गांधी-विनोबांचे नाव घेऊन ढोंगीपणा- देवेंद्र गावंडे

गांधी-विनोबांचे विचार सांगणे व त्यावर प्रत्यक्ष कृती या दोन भिन्न गोष्टी आहेत. आज गांधी-विनोबांचे नाव घेऊनही त्यांच्या विचारांना तिलांजली देणाऱ्या ढोंगी लोकांची संख्या वाढत आहे. नुकतेच सेवाग्राम येथे आयोजित गांधींवरील कार्यक्रमासाठी विदेशातून येणाऱ्या २२ पैकी १२ लोकांचा व्हिसा शेवटच्या क्षणापर्यंत अडकवून ठेवण्यात आला. असे का घडले, हा प्रश्न उपस्थित करून सरकारवर शंका घेतली जाऊ शकते. गांधींचा संदर्भ असलेल्या कलाकृतींना अटकाव घातला जात आहे आणि त्याचवेळी गोडसेवरील नाटकांचे रतीब पाडले जात आहेत. गोडसे आणि गांधींच्या विचारांचे द्वंद असे गोंडस नाव देऊन आपले छुपे धोरण राबवले जात आहे, परंतु गोडसे आणि गांधी यांची वैचारिक तुलना होऊच शकत नाही. कारण, जिथे विचार संपतात तिथेच हिंसा सुरू होत असते. काही लोक म्हणतात, यापुढे एकच राजकीय पक्ष राहील. असे म्हणणेही गांधी विचारांचा खूनच आहे, असे स्पष्ट मत देवेंद्र गावंडे यांनी व्यक्त केले.

### आध्यात्मिक लोकशाहीमुळेच घटनात्मक लोकशाही अबाधित - सहस्रबुद्धे

गांधी-विनोबांनीही आध्यात्मिक लोकशाहीचा विचार नेहमी मांडला. आध्यात्मिक लोकशाहीमुळेच घटनात्मक लोकशाही अबाधित आहे, असे प्रतिपादन परिसंवादाचे अध्यक्ष विनय सहस्रबुद्धे यांनी केले. ते म्हणाले, आधी संमेलनात काही बाबतीत अस्पृश्यतेची छाया असायची. आता ते अस्पृश्यतेचे ढग दूर झाले आहेत. गांधी-विनोबांचे विचार सनातन आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रासंगिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणे अयोग्य आहे. दांभिकतेचा वेढा सैल करायचा असेल तर आपल्या कृतीत आधी गांधी-विनोबा डोकावले पाहिजेत, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

FOR EDUCATIONAL USE

# गांधी- विनोबांच्या देशात गुन्हेगारांचे उदात्तीकरण!

श्रीकांत देशमुख यांचा उद्वेग; 'गांधीजी ते विनोबाजी: वर्तमानाच्या परिप्रेक्ष्यातून' वर परिसंवाद

शफी पठाण, लोकसत्ता

राष्ट्रपिता महात्मा गांधी साहित्य नगरी, वर्धा: बिल्कीस बानोवर बलात्कार करणाऱ्यांचा जाहीर सत्कार केला जातोय, शेतकरी हा शब्द आत्महत्या असाही लिहीला जाऊ शकतो. इतकी त्यांची अवस्था बिकट आहे. गांधी-विनोबांचा वैचारिक वारसा सांगणाऱ्या या देशात हे घडतेय, याचा अर्थ आज गांधी- विनोबांचे विचार कालबाह्य झाले आहेत, असे परखड प्रतिपादन साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखक श्रीकांत देशमुख यांनी केले. ते आज रविवारी साहित्य संमेलनात आयोजित 'गांधीजी ते विनोबाजी: वर्तमानाच्या परिप्रेक्ष्यातून' या विषयावर परिसंवादात बोलत होते. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी भाजप नेते व राज्यसभेचे सदस्य विनय सहस्त्रबुद्धे, तर प्रमुख वक्ते म्हणून 'लोकसत्ता'च्या विदर्भ आवृत्तीचे निवासी संपादक देवेंद्र गावंडे गोव्याचे माजी उपमुख्यमंत्री रमाकांत खलप, डॉ. प्रशांत धर्माधिकारी व भानू काळे हे होते.

यावेळी श्रीकांत देशमुख म्हणाले, गांधी- विनोबांचा सद्भावनेवर विश्वास होता, परंतु २०१४ च्या नवीन स्वातंत्र्या-नंतर ही सद्भावनाच नष्ट झाली आहे. बोलणाऱ्यांची नि बोलणाऱ्यांचीच परंपरा निर्माण होत आहे. कुठल्याही गोष्टीच्या चिकित्सेची परवानगी नाकारली जात आहे, याकडेही त्यांनी आपल्या भाषणातून लक्ष वेधले.

FOR EDUCATIONAL USE

Sundaram®

गांधी-विनोबांचे नाव घेऊन ढोंगीपणा - देवेंद्र गावंडे

गांधी-विनोबांचे विचार सांगणे व त्यावर प्रत्यक्ष कृती या दोन भिन्न गोष्टी आहेत. आज गांधी-विनोबांचे नाव घेऊनही त्यांच्या विचारांना तिलांजली देणाऱ्या ढोंगी लोकांची संख्या वाढत आहे. नुकतेच सेवाग्राम येथे आयोजित गांधींवरील कार्यक्रमासाठी विदेशातून येणाऱ्या 22 पैकी 12 लोकांचा व्हिसा शेवटच्या क्षणापर्यंत अडकवून ठेवण्यात आला. असे का घडले, हा प्रश्न उपस्थित करून सरकारवर शंका घेतली जाऊ शकते. गांधींचा संदर्भ असलेल्या कलाकृतींना अटकाव घातला जात आहे आणि त्याचवेळी गोडसेवरील नाटकांचे रतीब पाडले जात आहेत. गोडसे आणि गांधींच्या विचारांचे व्दंद असे गोंडस नाव देऊन आपले छुपे धोरण राबवले जात आहे, परंतु गोडसे आणि गांधी यांची वैचारिक तुलना होऊच शकत नाही. कारण, जिथे विचार संपतात तिथेच हिंसा सुरु होत असते. काही लोक म्हणतात, यापुढे एकच राजकीय पक्ष राहील असे म्हणणेही गांधी विचारांचा खूनच आहे, असे स्पष्ट मत देवेंद्र गावंडे यांनी व्यक्त केले आहे.

अध्यात्मिक लोकशाहीमुळेच घटनात्मक लोकशाही अबाधित - सहस्त्रबुद्धे

गांधी-विनोबांनीही अध्यात्मिक लोकशाहीचा विचार नेहमी मांडला. अध्यात्मिक लोकशाहीमुळेच घटनात्मक लोकशाही अबाधित राहते, असे प्रतिपादन परिसंवादाचे अध्यक्ष विनय सहस्त्रबुद्धे यांनी केले. ते म्हणाले, आधी संमेलनात काही बाबतीत अस्पृश्यतेची छाया असायची. आता ते अस्पृश्यतेचे ढग दूर झाले आहेत. गांधी विनोबांचे विचार सनातन आहेत. त्यामुळे त्यांच्या प्रासंगिकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणे अयोग्य आहे. दांभिकतेचा वेढा सैल करायचा असेल तर आपल्या कृतीत आधी गांधी-विनोबा डोकावले पाहिजेत, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

Sundaram®
FOR EDUCATIONAL USE

# ग्रंथ परिक्षण

## पाचोळा

आज आपण कोणत्याही ग्रामीण कादंबरीचा विचार करताना तिच्या 'ग्रामीणत्वा कडे खास लक्ष पुरवीत नाही. एके काळी ग्रामीण जीवनाबद्दल नागर वाचकांचे असणारे कुतूहल पूर्ण करण्यासाठी ग्रामीण कथात्मक वाङ्मय लिहीले जात होते. ग्रामीण जीवनाचे उदात्तीकरण बोधाच्या हेतूने केले जात होते. ग्रामीण जीवनातील परंपराप्रेम, विविध निष्ठा, वंशपरंपरागत वैरे, निरागसपणा, रंगेलपणा इत्यादी गोष्टींची चित्रे रंजनाच्या हेतूने काढली जात होती. सुदैवाने आजचा वाचक निदान चोखंदळ वाचक तरी ग्रामीण कथात्मक वाङ्मयातील ग्रामीणत्वाकडे एक अपरिहार्य सहचारी विरोध एवढयाच दृष्टीने पाहतो. ग्रामीण लेखक कोणता जीवनानुभव अर्थपुर्णपणे कलात्मक पातळीवर चित्रीत करतो हे पाहण्याची दृष्टी आज प्राधान्याने आढळते.

प्रा. रा. रं. बोराडे यांच्या 'पाचोळा' या आटोपशीर कादंबरीला एका चांगल्या शोकात्मिकेचा आकार प्राप्त झालेला आहे. एका ग्रामीण परिसरात घडणाऱ्या कथेचे चित्र येथे येते. या ग्रामीण जीवनात भव्यतेला, पराक्रमाला, ऐश्वर्याला अवसर नाही. इथले जीवन लौकिक दृष्टीने तरी खुजे आहे. माणसे मर्यादित ताकदीची. त्यांच्या इच्छा- आकांक्षा अल्पशा हेवेदाचे क्षुद्र, स्पर्धा संकुचित क्षेत्रातील; परंतु इथले जीवन अखेर मानवी जीवन आहे सनातन आशा, प्रेम, वात्सल्य, अहंकार इ. मानवी भावनांचा

FOR EDUCATIONAL USE

आविष्कार जसा इथे होतो तसाच मानवी जीवनातील शोकात्म जीवनकलहाचाही होतो. ग्रामीण जीवन जगणाऱ्या सामान्य व्यक्तीचे चित्रण बोराडे यांनी या कादंबरीत केले आहे खरे, परंतु हे करीत असताना मुलभूत स्वरूपाच्या मानवी जीवनातील समस्येचे (human Situation चे) आकलन त्यांनी कलात्मक पातळीवर नेले आहे व आपल्या कथेला शोकात्मिकेचा घाट प्राप्त करून दिला आहे. म्हणून प्रस्तुत कादंबरीचा विचार करताना तीमधून कोणता शोकात्म जीवनानुभव कलात्मकपणे प्रकट होतो याचा अर्थ घेणे अगत्याचे ठरते. या कादंबरीत जी शोकात्मिका चित्रित होते ती कोणा अलौकिक पराक्रमी वीराची नाही. ही शोकात्मिका लौकिकदृष्ट्या तरी सामान्य असणाऱ्या एका व्यक्तीची- एका कुटुंबाची आहे. सामान्याची शोकात्मिका असल्याने तिची कलात्मक परिणामकारकता जशी कमी होत नाही तशीच तिची विश्वात्मकताही कमी होत नाही. ही शोकात्मिका एकट्या गंगारामची भानाच्या बापाची नाही.

वेगाने विनाशाकडे जाणारा गंगाराम आपल्याबरोबरच आपल्या कुटुंबाचीही दुर्दशा करतो. ही एका कुटुंबाची दुःखकथा आहे. या शोकात्मिकेची वीण साधली गेली आहे. ती मुख्यतः गंगाराम शिंपी व गरड यांच्या विरोधात्म ताणाचे चित्रण करून यात आणखी एक विरोधात्म ताण निर्माण होतो. या ताणाचे चित्रण गंगाराम व त्याचा मुलगा या दोघांमध्ये निर्माण होतो. या ताणाचे चित्रण प्रत्ययकारी आणि अर्थपुर्ण बनते ते भानाच्या आईच्या विनोदामुळे. भानाची आई ही आपले दारिद्र्य आपल्या मर्यादा यांची जाणीव असलेली त्यांचा स्वीकार केलेली अशी दाखवली आहे. जे चाललं होत त्यात बर चाल्लं होत. होनाच एक नव्हत

FOR EDUCATIONAL USE

का दोन नव्हतं म्हणून समाधान मानणारी. कुणाच्या अगडा ओढवून घ्यायची कल्पनाही तिला सहन होत नव्हती. निदान गरडासारखा दृष्ट, ताकदवान आणि खडूस माण-माणसाचा. 'गावातल्या भल्या भल्या लोकांना त्येनं दावलाया. आपुन तर काय निव्वळ पाचूल्यावानी. आपले पाचोळापण मान्य करून परिस्थितीशी मिळते-जुळते घ्यावे. बलिष्ठांशी लवून नमून वागावे अशी तिची वृत्ती. अशी अतिसामान्य असणारी मानाची आई तीच निवेदन करीत असल्यामुळे एरवी सामान्य असलेल्या गंगाराममधील वेगळेपणाचा प्रत्यय येऊ शकतो व या जीवनचरित्राला अर्थपूर्णता प्राप्त होऊ शकते.

मानाचा बाप एक सामान्य शिंपी आहे. 'फॅसन' माहित नसलेला, मोठा काम करणारा. घरची गरिबी असुनही कुणाचे ऐवढे कापड राहिले तर ते परत करण्याचा प्रामाणिकपणा त्याच्या ठिकाणी आहे. बायको रोजगार करून संसारास मदत करणारी या अकुशल दरिद्री सामान्य माणसाला स्वाभिमान मात्र आहे. गंगाराम त्याच्या बायकोप्रमाणे आपले पाचोळेपण मान्य करीत नाही. पड खायची त्याची तयारी नसते. गरड हो गावातील बलाढ्य निर्दयी आसामी. आपले दुबळेपण लक्षात न घेता गरडासारखा प्रचंड उद्दाम ताकदीशी तो झुंज घेतो. वाटेल ते पणाला लावतो. एका प्रचंड शक्ती-बरोबर एका दुबळ्याचा हा असमान लढा आहे त्यात त्याची त्याच्या कुटुंबाची वाताहत होते, याचे शोकात्म चित्रण बोराडे यांनी रेखाटले आहे. हे चित्रण करताना गंगाराम यांनी नायक म्हणून दाखवले नाही. की समा-न्यातील असामान्यपण डोळ्यांत भरावे अशा रीतीनेही त्याने चित्रण केलेले आही एकांकीपणे गंगाराम त्याच्या गुणवैशिष्ट्यांनी डोळ्यांत भरावा असा कोठेच प्रयत्न नाही.

म्हणूनच ही कथा जीवनाचे स्वाभाविक, सहज रूप धारण करते. ती एकट्या गंगारामची कथा न राहता एका कुटुंबाची कथा असते.

दंड घाला धोतराला म्हणून गरडाचा पोरगा गंगारामच्या पुढे मिसनीवर धोतर फेकतो. या घटनेपासून गंगाराम व गरड यांच्या संघर्षाला प्रारंभ होतो. या दोघांमधील संघर्षाचे चित्रण लेखकाने वैशिष्ट्यपूर्ण रीतीने केले आहे. गरडाचे प्रत्यक्ष चित्रण कादंबरीत कोठेच येत नाही. त्याची जाणीव होते ती त्याचा उर्मट मुलगा व कुचाळखोर मिसनवाला या प्रतिनिधींच्या आणि त्यांच्या निर्दय कृतीद्वारे गरडाचे अस्तित्व कादंबरीभर आपल्याला जाणवत राहते परंतु ते अप्रत्यक्षपणे म्हणून गरडाला अदृश्य निघृण व शक्तीमान अशा नियतीचे रूप आपोआप प्राप्त होते. आपल्याला प्रत्यक्ष दिसतो तो ईर्षा बाळगणारा झटके घेणारा तडफडणारा गंगाराम. त्याची दुबळीक आपल्याला जाणवत राहते व त्यामुळेच या जीवनचरित्राला एक प्रकारची अर्थपूर्णता प्राप्त होते. या पहिल्या घटनेपासूनच कथानकाला जी गतिमानता प्राप्त होते ती गंगारामच्या अंतापर्यंत टिकून राहते. गंगाराम जे जे करायला प्रवृत्त होतो त्यातून अन्य तणाव निर्माण होतात. तो कुठेच तडजोड करायला तयार नसतो. गरड मिसन आणणार हे ऐकून भानाची आई हादरते. गरडाकडे जाऊन मिळते घ्यावे असे ती गंगारामला सुचविते. आपले काही चुकलेच नाही तर त्याच्याकडे कशाला असे म्हणून तो तडजोड नाकारतो. चोळी स्पेशालिस्ट चोळी भादुदर म्हणून तो गंगारामची खोड काढतो. गंगाराम त्याच्याशी भांडण करतो. मिसनवाल्याशी मुकाबला करण्यासाठी भानाला शिवणकाम शिकविण्यासाठी तो भानाला लातूरला पाठवितो. भाना बापाच्या निर्ण-

याने दुखावते. मात्र आता भाना बदलते. गंगाराम आणि भाना यांच्यामधील विरोधाचा दुसरा ताण निर्माण होतो व जीवनचरित्र अधिक गुंतागुंतीचे बनत जाते.

हा दुसरा ताण निर्माण करताना भानाचे व्यक्ति चित्रण लेखकाने शोकात्मिकेचा प्रत्यय येईल व मानवी मनातील गुंतागुंत प्रत्ययाला येईल अशा तऱ्हेने केले आहे. भाना चौदा-पंधरा वर्षाचा पौगंडावस्थेतील मुलगा दाखविला आहे. तो आईशी लिप्त आहे. तिचे ऐकतो तिला मानतो म्हणून पुढच्या घटना शक्य होतात. लातूरचा मिसनवाला जेव्हा त्याला आईवरून शक्य होतो तेव्हा तो दुखावतो रागावतो व परत येतो गंगाराम मात्र उलट भानालाच रागावतो. गंगारामला बातमी कळते की त्याला गरडाच्या मुलाची संगत लागली आहे प्रत्यक्ष शत्रूच्या मुलाशी आपल्या मुलाने मैत्री करावी ही गंगारामवर कठोर प्रहार होतो. त्याच्या मनात मुलाबद्दल विरोधाची भावना निर्माण होते. आता आपला मुलगा आपल्याला मेला असे समजून तो गरडाशी झुंज देण्याची तयारी करतो. भाना घरी येतो खरा परंतु त्याची दखल घेण्याची गंगारामची तयारी नसते. त्या दोघांमध्ये एक शत्रुत्व निर्माण झालेले असते

गंगाराम स्वतःच शिवणकाम करण्यासाठी लातूरला जातो. लातूरचा मिसनवाला- गरडाचा मित्र- त्याचे पैसे बुडवतो म्हणून गंगाराम मारामारी करतो पोलिस त्याला पकडून नेतात. गंगारामची बायको त्याला परत गावी घेऊन येते. 'मिसनी'चे डोके चोरीला गेलेले असते. हा गरडाचा प्रताप स्पष्ट दिसत असतो परंतु पुराव्याच्या अभावी तो गरडावर

फिर्याद करु शकत नाही. त्याच्या जीवाची तडफड चाललेली असते. बायकोने सुचविल्याप्रमाणे दुसरा धंदा करण्याची त्याची तयारी नसते. गरडाशी झुंज देण्याची त्याची जिद्द कमी होत नाही. तो लातूरला जातो नवीन मिसन मिळवण्यासाठी रात्रंदिवस कष्ट करतो. अखेर घरी परततो तो आजारी पडून खंगलेल्या अवस्थेत.

अंथरुणाशी खिळलेल्या गंगाराममध्ये आता गरडाशी झुंज देण्याची ताकद उरलेली नसते. एक प्रकारे गरडाच्या झुंजीत तो पराभूत झालेला असतो. गरडाशी त्याची झुंज संपलेली असली असे दिसत असले तरी खरे म्हणजे संपलेली नसते. भानाशी त्याने वैर धरलेले आहेच. तो भानामध्ये गरडाला पाहतो. गंगारामचा सारा राग उसळतो आणि आपल्या दुबळ्या शरीरातली सारी शक्ती एकवटून तो भानाला लाथा- बुक्क्यांनी मारतो. सकाळी भानाची आई जेव्हा पाहते तेव्हा रक्त ओकून गतप्राण झालेला गंगाराम तिला दिसतो. त्याची झुंज संपलेली असते.

मृत्यूहीन बलाढ्य अशा व्यक्तीशी लढणाऱ्या दुबळ्याचा विनाश हा अपरिहार्यपणे असाच होणार, अशी शोकात्म जाणीव या कादंबरीतून प्रत्ययाला येते. माणसाचे माणूस म्हणून सारखे मूल्य आहे असे दुबळ्याने समजू नये. बलाढ्यासमोर तरी त्याने आपल्याला काही स्वतंत्र अस्तित्व आहे असे दाखवू नये. भानाची आई ही स्वतःचे व्यक्तित्व जिने विलोपून टाकले आहे, आपले 'पाचोळा' पण जिने सहजपणे मान्य केले आहे. अशी अतिसामान्य बाई आहे. ती आपल्या नवऱ्याशी व मुलाशी बद्ध आहे. तिचे सुख, भविष्य त्यांच्यावर अवलंबून आहे. म्हणून गंगाराम व गरड व भाना

यांच्यामधील तणावांचे चित्र बारकाईने येऊ शकते.
मराठी ग्रामीण कादंबरीने आता ग्रामीणतेची अवकक्षा ओलांडली आहे. चित्रण करण्याच्या दृष्टीने अवघड असलेली अर्थपुर्ण जीवनानुभव कलात्मपणे प्रकट करण्याचे सामर्थ्य आता तिच्या ठिकाणी आले आहे. याचीच साक्ष प्रा. बोराडे यांच्या 'पाचोळा' या कादंबरीतून पटते.

शैक्षणिक वर्ष - 2022-23 Sem V

महाविद्यालयाचे नाव :- सोनोपंत दांडेकर महाविद्यालय पालघर

विद्यार्थ्याचे नाव :- विधि संतोष तरे

हजेरी क्रमांक :- 685

विषयाचे नाव :- मराठी

प्रकल्पाचे नाव :- पेपर नंबर सहा साहित्य आणि समाज

मार्गदर्शक :- प्रा. विवेक कुडू सर

वर्ग :- तृतीय वर्ष कला

सत्र :- पाचवे

19/20

# अनुक्रमणिका


| अ. क्र | मुद्दे | पृष्ठ. क्र |
|---|---|---|
| 1] | साहित्य, समाज, संस्कृती या संकल्पना व त्यांचा परस्परसंबंधाचे स्वरूप. | 1 ते 6 |
| 2] | साहित्य - समाज संबंध टिपणे :- | |
| | अ] मानवतावाद | 7 ते |
| | ब] मार्क्सवाद | 10 ते |
| | क] स्त्रीवाद | 12 ते |
| | ड] आंबेडकरवाद | 16 |
| | ई] तेनचा सिद्धांत | 19 |
| 3] | महेश केळूसकर यांच्या- 'क्रमशः' चे विश्लेषण | 2 |
| 4] | कल्पना दुधाळ यांच्या- 'धग असतेच आसपास!' चे विश्लेषण | |

1) साहित्य समाज आणि संस्कृती या संकल्पना स्पष्ट करून त्यांतील परस्पर संबंध स्पष्ट करा.

साहित्य, समाज आणि संस्कृती ह्या तिनही संकल्पना परस्परपुरक आहेत. माणूस हा साहित्याचा केंद्रबिंदू आहे. आणि माणसाची जडणघडण समाजाच्या, संस्कृतीच्या सहाय्यानेच होत असते. म्हणूनच साहित्याला मानवतावादाचा पाया असतो. मानवतावादा मध्ये मानव आणि समाजजीवन या विषयांची विचारप्रणाली असते. त्यामुळेच वरील संकल्पनांचा अभ्यास शास्त्रीय दृष्टीकोनातून करावा लागतो.

हजारो वर्षापासून मानवी जीवनामध्ये अनेक घडामोडी घडून आल्या आहेत आणि त्याचे प्रतिबींब साहित्यामध्ये मांडलाना दीसते आहे. साहित्य हा संस्कृतीचा एक घटक आहे. तर संस्कृती ही समाजाचे एक लक्षण आहे.

समाज हा ओळखता येण्यासारख्या लोकसमुदाय असते उदाहरणार्थ आदिम किंवा आदिवासी समाज, भटका विमुक्त समाज शेतीशी निगडीत समाज आधुनिक शहरी समाज इतर प्राणी कळप किंवा समुदाय करून राहतात तर मनुष्य प्राणी समाज करून राहतो म्हणून माणूस हा समाजशील प्राणी आहे असे म्हटले जाते. संस्कृती विकसित करण्याचे काम मानवी वर्तनातून घटत असते.

समाज या संकल्पनेचे मुल्यमापन :-

समाज हा साहित्यनिर्मितीमधील आणि साहित्य व्यवहारातील अतिशय महत्वाचा घटक आहे कारण समाज बदलला की साहित्य बदलते लेखकाची जडणघडण समाजात होत असल्यामुळे समाजातील अनेक चांगल्या वाईट घटनांचा परिणाम त्याच्या व्यक्तिमत्वावर होत असतो. अशा अनेक संस्था कार्यरत असतात. समाजाचे यश-अपयश या संस्थावर अवलंबून असते. समाज ही संकल्पना अनेक विचारवंतांनी स्पष्ट केली आहे.

1) मॅक आयव्हर आणि पेज
'समाज म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळे असते

2) राईट
'समाज म्हणजे व्यक्तींचा केवळ समुदाय नाही तर समुदायातील व्यक्ती- व्यक्तींच्या परस्परसंबंधाची ती एक व्यवस्था असते.

3) टॅरी जॉन्सन
'विशिष्ट भौगोलिक प्रदेशात स्थायी झालेल्या लोकांमधील सातत्यपूर्ण स्वरूपाच्या परस्परसंबंधांची व्यवस्था म्हणजे समाज होय.

समाज हा जन्मापासूनच माणसाला अनेक मार्गांनी समृद्ध करीत असतो. या अनुभवातूनच चांगली माणसे, चांगले लेखक आणि विचारवंत घडत असतात.

साहित्य या संकल्पनेचे मुल्यमापन :-
साहित्य या शब्दाची परिपुर्ण व्याख्या करता येत नसली तरी त्याबद्दल काही निरीक्षणे मांडता येतात. साहित्य व्यवहार ही एक व्यापक आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. साहित्य व्यवहारात निर्माता आणि वाचक हे दोन घटक महत्त्वाचे असतात. आणि ते काळानुसार बदलतात. कोणत्याही काळातील साहित्य भाषेशिवाय अस्तित्वातच म्हणजे साहित्य अशीही साहित्याची व्याख्या करता येते. कथा, काव्य महाकाव्य लावणी, पोवाडा, अभंग, ओव्या, कथा, कादंबरी, नाटक, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, निबंध असे साहित्याचे विविध प्रकार आहेत.

1) भामह :-
'शब्द आणि अर्थ यांच्या साहीत्त्याला काव्य (साहित्य) असे म्हणतात.

दंडी :-
'इष्ट अर्थाने युक्त असलेली पदावली म्हणजे काव्यशरीर'.

जगन्नाथ :-
'रमणीय अर्थ प्रतिपादन करणारे शब्दार्थ म्हणजे काव्य

साहित्यातून व्यक्ती आविष्कृत होतो. त्याचे अनुभव कल्पनाशक्तीच्या माध्यमातून मांडतो. जीवनातील सर्वच अनुभव साहित्यात येत नाही तर महत्त्वाचे, अर्थपूर्ण असेच प्रसंग तो शब्दबद्ध करतो.

संस्कृती या संकल्पनेचे मुल्यमापन :-
प्रत्येक मानवी समुहाला एक संस्कृती असते आणि ही संस्कृती भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक घटकांच्या वेगळेपणामुळे परिणाम साहित्यलेखनावर होत असतो.

एडवर्ड टायटर
'समाजाचा एक सदस्य म्हणून माणूस जे ज्ञान, कला, श्रद्धा-अंधश्रद्धा, कायदे आणि परंपरा तसेच काहीसवयी संपादीत करतो त्या सवयीचा संमिश्र एकीकरणाला संस्कृती असे म्हणतात.'

एलफ लिंटन
'संस्कृती ही शिक्षीत वर्तन प्रकारांच्या फलांची संघटीत किंवा साचेबंद समग्रता होय मनुष्य समाजाचा सदस्य या नात्याने जो वर्तन प्रकार शिकतो त्या वर्तन प्रकाराची फले संस्कृतीमध्ये समाविष्ट होतात.

वरील सर्व विश्लेषणातून हेच स्पष्ट होते की, मानवी समुदाच्या अंतक्रीयेतून संपर्कातून संस्कृतीची उभारणी होत असते.

समाज, साहित्य आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध / अनुबंध / अन्योन्यसंबंध :-

साहित्य आणि समाज यांच्यातील परस्परसंबंधांचे स्वरूप अगदी प्राचीन आहे. कालानुसार त्यामध्ये बदल घडत जातो. संस्कृतीच्या अनुषंगाने झालेला बदल समाज व साहित्य परिवर्तनासाठी महत्त्वाचा असतो. समाजात होणारे सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक तसेच राजकीय बदल मानवी जीवनावर परिणाम करतात. परिणामी माणसाच्या जाणीवा बदलतात. संवेदनशील साहित्यिकाच्या मनावर त्याचा परिणाम होतो.

संत ज्ञानेश्वरांनी १३ व्या शतकात समाजाच्या नातेसंबंधामध्ये सुसंवाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला
उदाहरणार्थ :-

दुरितांचे तिमिर जाओ, विश्व स्वधर्म सुर्य पाहो।
जो जे वांछिल तो ते लाहो, प्राणीजात ॥

संत तुकारामांनी समाजाच्या विसंवादावर भाष्य केले आहे ते म्हणतात की,

भले तरी देऊ। कासेची लंगोटी।
नाठाळाचे माथी। हानू काठी ॥

या उदाहरणामधून समाजातील संवाद आणि विसंवाद अधोरेखित झालेला आहे. १४ व्या शतकामध्ये संत कबीरांनी समाजातील जातीभेदावर प्रहार केले आहेत. ते म्हणतात की,

"जात नही जगदीश की। हरिजन की कहा होए।

संत कबीरांनी समाजाला चांगली शिकवण देण्याचा प्रयत्न केला. १९ व्या शतकाच्या सुरुवातीस कवी केशवसुत यांनी

"नव्या मनुतिल नव्या दमाचा शूर शिपाई आहे
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे"

असे म्हणत परिवर्तनाची नवी सुरुवात केली महात्मा जोतिबा फुले यांनी सुद्धा जाती व्यवस्थेविरुद्ध आणि प्रस्थापितांच्या-

अन्यायी धोरणाविरूद्ध शब्दांनी आसुड ओढले.

संत साहित्य, पंडिती साहित्य आणि शाहिरी साहित्य विविध घटना प्रसंगांनी भारलेले आहे. समाजातील अनेक गोष्टींना लेखकांनी साहित्यरूप देण्याचा प्रयत्न केला आहे. आधुनिक मराठी साहित्याची सुरूवात इंग्रजांच्या आगमनानंतर १८१८ मध्ये झाली तेव्हापासून अनेक निबंधकारांनी, कथाकारांनी, कवी तसेच कादंबरीकारांनी समाजातील विषमतेवर प्रहार केले. समाजात आलेल्या आधुनिकीकरणाने साहित्यलेखनसुद्धा बदलले.

आधुनिक मराठी साहित्यात शिक्षणाचा प्रसार, शहरीजीवनशैली, मांडवलदारांचा उदय, पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव, वाढते औद्योगिकीकरण अशा अनेक गोष्टींनी मानवी जीवन ढवळून निघाले परिणामी साहित्याचे संदर्भसुद्धा बदलले.

" कामगार आहे मी तळपती तलवार आहे
सारस्वतांनो थोडासा गुन्हा करणार आहे."

अशा प्रेरणादायी कवितेतून नारायण सुर्वे यांनी बदलत्या जनजीवनाची मुहुर्तमेढ रोवली. म्हणून साहित्य हे समाजामध्ये बदल घडवून आणू शकते याची प्रचीती अनेकांना आली. साहित्याच्या माध्यमातून साहित्यीक भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भाविष्यकाळाचाही वेध घेतो. ~~म्हणून~~ म्हणजे साहित्यातून त्रिकालिक अनुभूती होत असते.

साहित्य आणि समाज यांच्या परस्परसंबंधाचा अभ्यास करताना काही महत्वाच्या बाबी लक्षात घ्याव्या लागतात.

1) साहित्याची व्याप्ती व मर्यादा तपासणे.
2) साहित्याचे समाजातले कार्य अधोरेखित करणे.
3) साहित्याचा समाजावर झालेला परिणाम तपासणे.
4) साहित्यास सामाजिक दृष्टीकोनातून शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे व लेखकाच्या लेखनतंत्राचे मुल्यमापन करणे.

अशा अनेक बाबी अभ्यासकाने उलगडून पाहाव्या त्या यातूनच साहित्य, समाज आणि संस्कृती यांच्या परस्पर संबंधाचे आपणास मुल्यमापन करता येते.

अशाप्रकारे साहित्य, समाज आणि संस्कृती या तीनही संकल्पनांचा अभ्यास करताना समाजाचे व साहित्याचे असलेले परस्परसंबंध संस्कृतीच्या अनुषंगाने आपणास तपासता येतात.

२) खालील टिपणे लिहा.

अ) मानवतावाद

मानवतावाद (Humanism) ही ग्रीक व रोमन विद्येवर आधारित १४ ते १६ व्या शतकाच्या दरम्यान उदय पावलेली वाङ्मय संस्कृती आहे. कालांतराने १८०८ मध्ये मानवतावाद हा शब्द जर्मनीतील एका शाळेतील पाठ्यक्रमाच्या बाबतीत. वापरला गेला. आणि त्यानंतर इंग्रजी भाषेमध्ये Humanism या अर्थाने स्वीकारला गेला मानवतावादामध्ये माणसाला केंद्रस्थानी ठेवले जाते आणि त्या अनुषंगाने स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय या मूल्यांची निर्मिती केली जाते.

'मानवतावाद' हे मानवी स्वातंत्र्याचे तत्वज्ञान आहे. 'मानव हा सर्व अस्तित्वाचा मानदंड आहे. हे त्याचे मुलभूत तत्व होय. मानव हाच त्याच्या भवितव्याचा शिल्पकार होय. असा मानवतावादाचा आग्रह आहे. त्याला कोणत्याही आधि दैविक शक्तींच्या नियंत्रणाखाली जसे राहण्याचे कारण नाही. त्याप्रमाणे दैवी प्रेरणेने सुद्धा त्याचे भवितव्य ठरत नसते. मानवतावादाचा आग्रह असा आहे की मानवीजीवन हेच अंतिम उद्दिष्ट मानल्यामुळे त्याला राष्ट्र, जाती किंवा वर्ग अशा काल्पनिक समुदात्मक अस्मितेत समाविष्ट करण्याची व त्यासाठी स्वतःचे बलिदान देण्याची आवश्यकता नाही.

एखादया आधिदैविक शक्तीच्या अस्तीत्वाची कल्पना झुगारून दिल्यामुळे आणि केवळ विज्ञानावर भिस्त ठेवल्यामुळे मानवतावादाने व्यक्तींच्या मानसिक पैलुंची आणि इच्छा आकांक्षांची प्राणीमात्रांच्या उत्क्रांतीशी संगती लावली आहे. मानवतावादाचे सामाजिक ध्येये स्वतंत्र नीतीमान स्त्रीपुरुषांच्या समान बनविण्याला मदत करणे हे आहे.

FOR EDUCATIONAL USE

मानवतावादाला ही जाणीव असते की लोकशाही ही समाजाच्या राजकीय संघटनेपुरतीच मर्यादित राहू शकत नाही. तर स्वातंत्र्य समता, बंधुत्व या लोकशाही मूल्यांनी सामाजिक जीवनाचे सर्व क्षेत्र व्यापले पाहिजे. समाजातील दारिद्र्य, अज्ञान, बेरोजगारी, आर्थिक विषमता दूर व्हावी यासाठी मानवतावादाचा प्रयत्न असतो. मराठी साहित्यामध्ये सुद्धा 'मानवतावाद' ही संकल्पना मोठ्या प्रमाणात अवतरली आहे.

उदा:- संत तुकाराम आपल्या अभंगात म्हणतात की,

" तुका म्हणे न लगे जावे व नांतरा।
विश्व विश्वंभरा सारिखेंची ॥ "

देव पाहण्यासाठी राना-वनात जाण्याची गरज नाही मानवी जीवनातच त्याचे अस्तित्व दडले आहे. हाच खरा मानवतावाद आहे.

'मानवतावाद' म्हणजे समृद्ध मानवी जीवन जगण्यात आवश्यक असणाऱ्या उदात्त मूल्यांचा समुह होय.

उदा. :- नामदेव ढसाळ आपल्या 'गोलपिठा' संग्रहातील एक कवितेत म्हणतात की,

'एक तीळ सर्वांनी करंडून खावा
माणसावरच सूक्त रचावे
माणसाचे गाणे. गावे माणसाने'

मानवतावादामध्ये माणूस केंद्रस्थानी असल्याचे सूचन वरील कवितेच्या काही व्याख्या पाहता येतील.

१) मानवाला मानव म्हणून सन्मानाने, स्वातंत्र्याने, स्वाभिमानाने व न्यायाने जगू देण्यासाठी निर्माण झालेला वाद म्हणजे मानवतावाद.

२) वैयक्तिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, राष्ट्रीय, वैश्विक पातळीवरील मानवी हक्क मागण्याचे धैर्य म्हणजे मानवतावाद.

9

3) वर्ण, जाती, धर्म यांना नकार देणे, स्त्री-पुरुष, गरिब - श्रीमंत भेद न मानणे, त्यांना मुक्त करणे यासाठी बंड करून उठणे म्हणजे मानवतावाद.

4) माणसांना निर्भय व क्रांतीशील बनविणे म्हणजे मानवतावाद

अशाप्रकारे 'मानवतावाद' ही संकल्पना स्पष्ट करीत असताना हे लक्षात येते की मानवतावाद हा काही एखादा धर्म-पंथ नव्हे किंवा प्रेषितांची शिकवण नव्हे किंवा गुरुने शिष्याला सांगितलेले तत्व नव्हे. तर मानवी समस्या सोडविण्याचे प्रमुख साधन म्हणून बुद्धिप्रामाण्याचा विचार अनुसरणे हेच सुत्र मानवतावादामध्ये अभिप्रेत आहे.

ब) मार्क्सवाद

कार्ल मार्क्स (१८१८ ते १८८३) हा १९ व्या शतकातील सुप्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ होता. पाया-इमला सिद्धान्त वगैरेंचना सिद्धान्त मांडताना त्याने साहित्य व सौंदर्य-विषयक दृष्टीकोन स्पष्ट केला आहे त्याच्या एकूण विचारसरणीला मार्क्सवाद असे म्हटले आहे त्याच्यानंतर लेनिन, जॉर्ज ल्युकाच, गोल्डमान अशा अनेक विचारवंतांनी त्याच्या विचारांना विस्तारीत केले आहे.

कार्ल मार्क्स आणि त्याचा मित्र एंगल्स यांनी माणसाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर कलेच्या उत्पत्तीचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

'माणूस ज्या प्राण्यातून उत्क्रांत झाला त्याला सत्य, शिव व सुन्दराची जाणीव नव्हती मगती केव्हा व कशी झालीर, या विधानाचा विचार करताना कार्लमार्क्स म्हणतो की, 'ऐतिहासिक प्रक्रीयेत सौंदर्याची जाणीव मानवी श्रमातून झाली. उत्पादक माणूस वस्तुचे सम्यक ज्ञान झाल्यामुळे तिच्यावर आधिपत्य गाजवू लागला. आणी सौंदर्यनिर्मिती होऊ लागली. मानवी इतिहास हा मुक्तीचा इतिहास आहे नैसर्गिक बंधने, अंगभूत वासना यापासून माणूस मुक्त होऊ पाहतो. लाकडाची हत्यारे कालांतराने दगडाची बनली नंतर लोखंड, तांबे-आणि जर्मनचा वापर होऊ लागला. त्यामध्ये कलात्मकता येऊ लागली.

मार्क्सवादामध्ये सौंदर्यविषयक दृष्टिकोनातील वेळोवेळी होणाऱ्या बदलासंदर्भात विवेचन आले आहे. मार्क्सच्या मते, 'भुकेल्याला संगीताचे सौंदर्य तर कळणार नाहीच पण भाकरीचे सौंदर्य ही कळणार नाही. कारण तो भाकरीचा, भूकेचा गुलाम असतो.' माणसाची कलात्मक शक्ती, त्याचा निसर्गाशी कलात्मक संवाद आणि सौंदर्यनिर्मिती हे सर्व श्रमप्रक्रियेतून घडत जाते.

FOR EDUCATIONAL USE

मार्क्सवादी विचारवंत जॉर्ज ल्युकाच यांच्या मते "नवसाहित्य विफलतेने ग्रासले आहे, निराशेने झाकोळले आहे. त्यातील मानसाचे दर्शन आहे ते निराशाग्रस्त एकाकी अशा प्राण्याचे" या विधानामध्ये काही प्रमाणात तथ्य वाटते कारण आधुनिक काळामध्ये निर्माण झालेल्या साहित्यात मानवी जीवनातील दुःखाचे अधिक वर्णन आले आहे. नवसाहित्यामध्ये आशावाद यायला हवा, ते जीवनवादी असायला हवे असे हे जॉर्ज ल्युकाचे म्हणणे आहे. कार्लमार्क्सचा मित्र ~~एम~~ एंगल्सने म्हटले आहे. की "साहित्य पक्षपाती असावे का? या प्रश्नाचे उत्तर हे साहित्य पक्षपाती असतेच' असे आहे" उदा- उदा- महाभारतात पांडवांकडे, रामायणात रामाकडे लेखकाचा जास्त कल आहे.

साहित्य हे लेखकांच्या जीवनदृष्टीचा आविष्कार असते हे सांगताना मार्क्सवादी समीक्षक गोल्डमान म्हणतो की, "ज्याला मी जीवनदृष्टी म्हणतो ती एका सामाजिक समुहाला एकत्रित बांधणाऱ्या कल्पना, आकांक्षात सामाजिक समुहाला एकत्रित बांधणाऱ्या कल्पना, आकांक्षात आणि जाणीवा ह्यांचा व्यामिश्र बंध असतो. आणि या बंधातून त्याचे इतर समाज ~~स~~समुहापासूनचे वेगळेपणा अथवा विरोध स्पष्ट होतो. गोल्डमानच्या ह्या मतावरून साहित्य वाचत असताना त्यामधील लेखकाच्या सामाजिक दृष्टीकोन लक्षात घेणे गरजेचे आहे. इटालियन मार्क्सवादी 'ग्रामची' यांच्या मते," अधिशास्तावर्ग राजकीय आणि सांस्कृतिक अशा दोन मार्गांनी आपले आधिराज्य प्रस्थापित करतो"

1) मार्क्सवादाजवळ मानवी जीवनविकासाबद्दल असल्याचे दिसून येते

2) साहित्याने जीवन विकासाच्या दिशेचा वेध घेण्याचा प्रयत्न करायला हवा. असेही मार्क्सवाद स्पष्ट करतो.

3) जीवन स्थितीशील नसून परिवर्तनशील आहे आणि परिवर्तनाचे प्रतिध्वनी साहित्यात ऐकू येतात. हे मार्क्सवाद स्पष्ट करतो.

अशाप्रकार मार्क्सवाद ही संकल्पना अधिक व्यापक दृष्टीने समाज व लेखकाची भूमिका याविषयी करताना दिसते. मानवी जीवनाविकास; जाणीवा आणि माणसाचा सौंदर्यविषयक दृष्टीकोन याचेही स्पष्टीकरण मार्क्सवादामध्ये येताना दिसते.

## क) स्त्रीवाद

स्त्रीवादी साहित्याची संकल्पना व्यापक दृष्टीने अभ्यासावी लागते. १९६० पर्यंतचे स्त्रीवादी जाणिवेचे साहित्य आणि त्यानंतरचे प्रखर जाणीवेने लिहिलेले साहित्य यामध्ये फरक आहे. स्त्रीवाद ही एक चळवळ आहे विचारदर्शन आहे. तत्वज्ञान आहे कोणत्याही परंपरेमध्ये स्त्रीयांचे राहिलेले आतापर्यंतचे स्थान आणि वर्तमानकाळ व भविष्यकाळातील स्त्रीजीवनाची वाटचाल या दृष्टीने स्त्रीवादी साहित्य भाष्य करते. हजारो वर्षापूर्वी भारत मध्ये मातृसत्ताक कुटूंब पध्दती होती. स्त्री पुरूषांसारखीच स्वतंत्र होती कालांतराने अग्नीचा शोध लागला आणि स्त्री घरकामापुरती माणसांची सेवा करते ती जीवन जगू लागली.

भारतीय समाजजीवनात धर्मानेच स्त्रीला 'शुद्रातिशूद्र' ठरविले आणि स्त्री गुलाम बनत गेली. 'मनुस्मृती' ने स्त्रीला पापाची खाण ठरविले मोक्षाच्या मार्गात आड येणारी धोंड म्हणून तिचा तिरस्कार केला. व्यवस्थे ने तिला उपभोगाची वस्तु मानले. आणि तिच्यावर मालकी हक्क लादला गेला. अनेक महापुरूषांनी स्त्रीयांच्या जीवन समृध्दीसाठी महत्वाचे योगदान दिले आहे. राजाराममोहन रॉय, महात्मा फुले, लोक हितवादी गोपाळगणेश आगरकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेकांनी स्त्रीयांच्या समाजजीवनाबद्दल महत्वाचे कार्य केले आहे.

* मराठी साहित्यातील स्त्रीवादी साहित्य प्रवाहाची वाटचाल

स्त्रीवादी साहित्य हे स्त्रीयांच्या भावभावनांना अभिव्यक्त करणारे साहित्य आहे. स्त्रीयांवर होणारे अन्याय, अत्याचार आणि त्यांची अनेक बाबतीतील गुलामी यासंदर्भात स्त्रीवादी साहित्य भाष्य करते. स्त्रीयांच्या आत्मसन्मानाला जागरूक करण्याचे ही कार्य करते. स्त्रीवादी साहित्य ही संज्ञा पाश्चात्य विचारवंतांची आहे. पाश्चात्य स्त्रीवादी-

स्त्रीवादी विचारांची सुरूवात १७९२ साली 'मेरी वुलस्टोनक्राफ्ट' या लेखिकेच्या 'स्त्रीयांच्या हक्कांचे समर्थन' या पुस्तकाने झाली असे मानले जाते. फ्रेंच लेखिका सिमॉन दि बोव्हा' यांच्या 'दि सेकंड सेक्स' या पुस्तकाने स्त्रीवादी साहित्याची वाटचाल प्रशस्त केली. स्त्रीवादी विचारसरणी ही सर्वप्रथम अमेरिका इंग्लंड आणि युरोप मध्ये उदयास आली. पुरूषांच्या बरोबरीने स्थान मिळावे अशी भूमिका तिथल्या स्त्रीयांनी घेतली. भारतामध्ये स्त्रीयांच्या लेखन कार्याला २० वे शतक उजाडावे लागले. मराठी साहित्य प्रवाहात कविता, कथा, कादंबरी आणि आत्मकथन, आत्मचरित्र या माध्यमातून स्त्रीयांनी आपले जीवनानुभव साकारले आहेत.

* स्त्रीयांचे कविता लेखन :-

मराठी साहित्य प्रवाहात संत, पंत आणि तंत साहित्यामध्ये स्त्रीयांनी आपले योगदान दिले परंतु विचारांची चळवळ रुजली नाही. त्यासाठी २० वे शतक उजाडावे लागले. १९६० पर्यंतच्या दीर्घकाळामध्ये काही कवयित्रींचेच कविता लेखन महत्त्वाचे ठरले आहे. त्यामध्ये संजीवनी मराठे यांच्या 'काव्यसंजीवनी' (१९३२), 'राका' (१९३९), संसार (१९४३), 'छाया' (१९४९) अशा महत्त्वाच्या कवितासंग्रहांच्या समावेश आहे. त्यानंतर शांता शेळके यांचा 'वर्षा' (१९४७) हा कवितासंग्रह ही महत्त्वपुर्ण आहे. लक्ष्मीबाई टिळक आणि बहिणाबाई चौधरी यांचे कवितासंग्रह (१९५१) मध्ये प्रसिद्ध झाले. इंदिरा संत यांचा 'शेला' हा कविता संग्रह सुद्धा (१९५१) मध्ये प्रसिद्ध झाला.

१९६० नंतर मराठी साहित्यात स्त्रीवादी साहित्य प्रवाहाने विशेष वळण घेतले. आणि कवितांमध्ये वास्तव स्त्री जीवना अवतरू लागले काही महत्त्वाच्या कवयित्रींच्या आपणास उल्लेख करता येईल. मलिका 'अमरशेख' यांचा 'वाळूचा प्रियकर' (१९७९) अनुराधा पाटील यांचा 'दिगंत' (१९८१) संजीवनी खोजे यांचा 'एकोली' (१९८६), 'प्रज्ञा लोखंडे यांचा 'अंतस्थ (१९९३), ' अंजली कुलकर्णी यांचा 'मी एक स्त्रीजातीय अस्वस्थ आत्मा' (१९९५) अशा अनेक कविता संग्रहातील

FOR EDUCATIONAL USE

कवीता मधून स्त्रीयांनी कौटुंबिक जीवन, प्रेम, प्रियकर, निसर्ग, दीवस, रात्र आणि स्त्रीयावर होणारे अन्याय अत्याचार असे अनेक विषय मांडले.

स्त्रीयांचे कथालेखन :-

स्त्रीयांच्या कथालेखनाचा विचार करता १८९६ मध्ये मासिक मनोरंजनात शांताबाई या लेखीकेच्या नावाने पहिली कथा प्रसिद्ध झाली आहे १९३३ मध्ये प्रसिद्ध झालेला विभावरी शिरूरकर यांचा 'कळ्यांचे निःश्वास' हा कवीता संग्रह स्त्रीयांच्या कथालेखनातील मानदंड मानला जातो या कथासंग्रहाने स्त्रीयांना स्वत्वाची जाणीव करून दिली. गौरी देशपांडे यांच्या 'आहे हे असं आहे', मेघना पेठे यांच्या 'हंस अकेला' या कथासंग्रहातील कथा अतिशय बंडखोर आणि विद्रोही प्रवृत्तीच्या आहेत. शांता किर्लोस्कर, वसुंधरा पटवर्धन, शिरीष पै, कमल देसाई विजया राज्याध्यक्ष, नीला श्रीवास्तव, आशा बगे अशा अनेक स्त्रीयांनी पुढच्या काळातील कथेला नवे वळण दिले आहे. वसुधा पाटील यांचा 'वंशाचा दिवा', प्रतिमा इंगोळे यांचे 'अकासिदीचे दाणे', निर्मला देशपांडे यांचा 'गर्ल', ऊर्मिला पवार यांचा 'सहावे बोट', सुकन्या आगाशे यांचा 'डास्पिलळ आणि पतंग उडवणारा माणूस' अशा अनेक कथासंग्रहांमध्ये लग्न, घटस्फोट, विधवा विवाह, वांज स्त्रीचे दुःख वर निवडण्याचे स्वातंत्र्य नसणे, पतीचे विवाहबाह्य संबंध, बालविवाह, लैंगिक कामवासना अशा अनेक विषयांवर स्त्रीयांनी कथालेखन केले आहे.

स्त्रीयांचे कादंबरीलेखन :-

स्त्रीयांचे कादंबरीलेखन हे स्त्री सुधारणेकडून स्त्री स्वातंत्र्याकडे जाताना दिसते. स्त्रीने स्वतःकडे 'अबला म्हणून नाही तर सबला म्हणून पाहावे' अशी भूमिका कादंबरी लेखनाची आहे. १८७३ मध्ये साळुबाई तांबवेकर यांनी लिहिलेली 'चंद्रप्रभा विरहवर्णन' ही पहिली स्त्री कादंबरी मानली जाते. परंतु त्यानंतर कादंबरी लेखनासाठी

२० वे शतक उजाडावे लागले. हुंडा पध्दतीला विरोध करण्यासाठी जान-कीबाई देसाई यांनी 'महलक्ष्मी' १९१५ ही कादंबरी लिहीली यशोदाबाई भट यांनी 'मुलाचे बंड' (१९२१) या कादंबरीमधून विधवांच्या समस्या मांडल्या शांताबाई नाशिककर यांनी 'दाच का धर्म' (१९३०) या का-दंबरीतून हिंदू समाजातील अन्यायी प्रथांवर कठोर प्रहार केले. कमलाबा-ई बंबवाले यांची 'बंधमुक्ता' गीतासाने यांची 'हिरवळी खाली' विभा-वरी शिरूरकर यांच्या 'हिंदोळ्यावर', 'बळी', 'जाई', 'शबरी' या कादंबऱ्यांमधून भारतीय स्त्रीजीवन अभिव्यक्त झाले आहे.

* स्त्रीयांचे आत्मचारित्र लेखन :-

आत्मचारित्र हा वाड्मय प्रकार आपल्या मनातील वेदना व्यक्त करण्यासाठी स्त्रीयांनी वापरला आहे. १९१० मध्ये रमाबाई रान डे यांनी 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे आत्मचारित्र लि-हिले परंतु १९२८ मधील पार्वतीबाई आगवले यांचे 'माझी कहाणी' हे मराठीतील पाहिले दर्जेदार आत्मचारित्र ठरते. त्यानंतर लक्ष्मीबाई टिळक यांचे 'स्मृतीचित्रे' (१९३४), शांता आपटे यांचे 'जाऊ मी सिनेमाल' (१९४०) आनंदीबाई कर्वे यांचे 'माझे पुराण' (१९४४), लीलाबाई पटवर्धन यांचे 'आमची अकरा वर्ष' (१९४५), रोहीणी भा टे यांचे 'माझी नृत्यसाधना' (१९५०) राधाबाई केदार यांचे 'वेचलेले मणी' (१९५२), राधाबाई आपटे यांचे 'ढकला रे ढकला दीन सख्या' (१९६१) गोदावरी परूळेकर यांचे 'जेव्हा माणूस जागा होतो' (१९७) दसा वाडकर यांचे 'सांगते ऐका' (१९७२), अशा लता भावे यांचे 'पाना आडचे फुल' (१९७५), मालिका अमरशेख यांचे 'मला उध्वस्त व्हायचंय' (१९८४) बेबी कांबळे यांचे 'जिणं आमुचं' (१९९५), नजुबाई गावित यांचे 'आदोर' (१९९५) अशा अनेक आत्मचारित्र व आत्मकथनां मधून स्त्रीयांनी आपल्या जीवन जाणीवा व्यक्त केल्या आहेत.

अशाप्रकारे स्त्रीवादी साहित्य प्रवाहाचे विवेचन करता येते.

## ड) आंबेडकरवाद

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारप्रणालीवर व तत्वज्ञानावर आधारित असे आंबेडकरवादाचे स्वरूप आहे. विशिष्ट विचारप्रणाली व तत्वज्ञानाचा निर्देश करण्यासाठी 'वाद' कींवा (ISm) 'इझम' या संज्ञेचा उपयोग केला जातो. कोणत्याही तत्वज्ञानाचे अस्तित्व त्यातील सार्वत्रिक, सार्वकालिक, वैश्विक तत्वांवर निर्धारित असते. विचार प्रणाली व तत्वज्ञानातिल सुक्ष्मभेद स्पष्ट करताना असे म्हणता येते की, 'विचारप्रणालीतील विचारव्यूह व्यावहारिकतेशी निगडित असतो. तिला व्यावहारिक पैलु असला तरी तिच्या उच्चाविकासावस्थेत ती तत्वज्ञानापर्यंत पोहचू शकते. काही विचारवंतांच्या मते तत्वज्ञान हे केवळस्वरूपी, उच्च मुल्यात्मक, वैश्विक व समग्र मानवजिवनाविषयीचे चिंतन असते.

आंबेडकरवाद म्हणजे काय हे स्पष्ट करताना सुप्रसिद्ध विचारवंत शरद पाटील यांनी म्हटले आहे की, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्धवाद आणि राज्यसमाजवाद यांचा जो समन्वय साधला आहे. त्यास आंबेडकरवाद म्हणता येईल.' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांमध्ये राष्ट्र, राष्ट्रवाद, राष्ट्रीयता याविषयी अनेकदा विवेचन आले आहे. त्यांच्याप्रमाणेच महात्मा फुलेंचा राष्ट्रवाद सुद्धा धर्मनिरपेक्ष, बहुजनकेंद्री मानणारा होता दोघांच्याही विचारांमध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवता आणि सामाजिक न्याय यावर भाष्य आलेले आहे. म्हणजेच आंबेडकरवाद हा विषमते विरूद्ध लढा देणारा वाद आहे. असे दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार विविध ग्रंथांमधून विखूरलेले दिसून येते. 'भारतातील जाती: घडण, उत्पत्ती आणि प्रसार' 'शुद्र पूर्वी कोण होते' 'अस्पृश्य मूळचे कोण होते? आणि अस्पृश्य कसे बनले' 'जाती-संस्थेचे उच्चाटन' 'कॉंग्रेस आणि गांधींनी

अस्पृश्यांप्रती काय केले?' 'हिंदू धर्माचे तत्वज्ञान' 'बुध्द की कार्लमार्क्स' 'बुध्द धर्माचा उदय आणि ऱ्हास' 'बुध्द आणि त्यांचा धम्म' अशा अनेक ग्रंथांमधून बाबासाहेबांचे राजकीय, सामाजिक, धार्मिक आर्थिक विचार प्रकट झाले आहेत. या विचारांमधूनच त्यांचे सिध्दान्त आणि आंबेडकरवाद म्हणजे काय याविषयीचे विवेचन येते. डॉ. बाब आंबेडकरांचे तत्वज्ञान, भौतिकवादी, विज्ञाननिष्ठ, समन्वयवादी, अनीश्वरवादी धर्मनिरपेक्ष, लोकशाही व समाजवादी आहे. त्यांचे ध्येय वर्ण, वर्ग, जात आणि स्त्रीदास्य अंत हे आहे तर त्यांची मुल्य समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय, मानवता ही आहेत. डॉ. आंबेडकरांचे विचार पारंपारिक आणि अपारंपरिक या दोन्ही कसोट्यांवर तत्वज्ञानाच्या निकषांवर उतरतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर त्यांच्या विचारांचे अनेक अनुयायी निर्माण झाले. त्यांनी आंबेडकरवाद ही संकल्पना विस्तारण्याचे महत्त्वाचे कार्य केले. त्यांमध्ये डॉ. गंगाधर पानतावणे, डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. यशवंत मनोहर, डॉ. ताराचंद्र खांडेकर, डॉ आनंद तेलतुंबडे अशा अनेक विचारवंतांनी नेमका आंबेडकरवाद समजून सांगण्याचा प्रयत्न केला.

उदा :- महात्मा फुले यांनी वरिष्ठ वर्णाविरूध्दच्या लढाईत शूद्रातिशूद्रांच्या ऐक्याची आवश्यकता सांगितली तर डॉ. आंबेडकरांनी शुद्राकडून अतिशूद्रावर होणारे अत्याचार पाहिले होते. म्हणूनच ते महाडच्या सत्याग्रहा वेळी ब्राह्मणांना विरोध करण्यापेक्षा ब्राह्मण्याला विरोध करतात.

या उदाहरणावरून असे लक्षात येते की विषमतावादी ब्राह्मण्य हे केवळ ब्राम्हणातच नसते तर कोणत्याही वर्ण, जातीच्या मानसिकतेत असू शकतो. अशी डॉ. आंबेडकरांची धारणा होती. म्हणून त्यांनी ब्राम्हण, ब्राम्हणेतर, आणि बहिष्कृत असे 3 वर्ग केले. अस्पृश्यतेच्या उगमाची 2 कारणे त्यांनी दिली आहेत.

FOR EDUCATIONAL USE

1) अस्पृश्य लोक बौद्ध धर्माचे अनुयायी होते
2) ब्राह्मण व इतरांनी गोमांस खाणे सोडले तरी वाताहत झालेल्या लोकां-नी सुरूच ठेवले त्यामुळे ते अस्पृश्य गणले गेले.

अस्पृश्यता ही आर्थिक व्यवस्था कशी आहे याबद्दल डॉ. आंबेडकर म्हणतात की, 'तंदीच्या काळात नोकरी व्यवसायातून दूर केला जाणारा पहिला घटक अस्पृश्य तर अंतिम घटक हिंदू असतो. उलट तेजीच्या काळात नोकरी व्यवसायात प्रथम प्रवेश करणारा घटक हिंदू असतो. तर अंतिम संधीस पात्र ठरणारा घटक अस्पृश्य असतो.

कार्लमार्क्सने जगाचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. असे म्हटले. भारतातील मुख्य प्रश्न वर्ण जातीचा आहे. आणि वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था उच्चाटनाचे शास्त्र केवळ डॉ. आंबेडकरांनीच मांडले. त्यांच्या मते, ' भारतातील जातीव्यवस्थेच्या इमारतीस पायऱ्याच नाहीत. म्हणून एकाला दुसऱ्या मजल्यावर जाता येत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सिद्धांत, विचार आणि अवधारातून आंबेडकरवादाचे स्वरूप स्पष्ट होते. भौतिकवादी, विज्ञाननिष्ठ, जडचैतन्यवादी, अनीश्वरवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही, समाजवाद असे आंबेडकरवादाचे स्वरूप आहे. वर्ण, वर्ग, जात, स्त्रीदास्य यांचा अंत हे आंबेडकरवादाचे ध्येय आहे. तर समता, स्वातंत्र्य बंधुता, मानवता, सामाजिक न्याय, प्रज्ञाशील, करुणा आणि मैत्री ही मूल्य रुजविण्यामध्ये आंबेडकरवादाचे फलित आहे.

अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारीत आंबेडकरवादाचे स्वरूप आपल्यास विश्लेषित करता येते.

ई] तेनचा सिध्दांत

(१८२८ ते १८९३) इम्पोलियन तेन हा १९ व्या शतका-त होऊन गेलेला फ्रेंच विचारवंत सुप्रसिध्द समीक्षक म्हणून प्रसिध्द आहे

"लेखकाने निर्माण केलेली साहित्यकृती ही केवळ एक वाङ्मयीन घटना नसून ती एक सामाजिक घटना आहे" साहित्य कृतीची निर्मिती एखादा लेखक करतो म्हणून ती पुर्णपणे स्वतंत्र-निर्मिती ठरत नाही. त्यामध्ये समाजमूल्य दडलेली असतात. परंपरे-ने काही गुणधर्म लेखकामध्ये दडलेले असतात. त्या अनुषंगानेच नाविन्यपूर्ण कलाकृती अवतरेल. त्यामुळेच प्रत्येक देशामधला, प्रां-तामधला माणूस वेगळा ठरतो. या पोटभेदांच्या अनुषंगाने इम्पो-लियन तेन यांनी एक महत्त्वाचा सिध्दान्त मांडला आहे. त्रिसुत्री मांडली आहेत.

इम्पोलियन तेनच्या सिध्दान्त / त्रिसुत्री
वंश / देश
वेळ / काल / युगधर्म
परिवेश / परिस्थिती

वंश / देश :-
इम्पोलियन तेनच्या मते, कोणताही लेखक / साहित्यिक हा कोणत्यातरी देशात / वंशामध्ये जन्म घेत असतो. त्या देशातील, वंशातील काही गुणधर्म लेखकाच्या व्यक्तीमत्वात मिसळले जाता-त साहित्याच्या माध्यमातून हेच गुणधर्म बाहेर येतात तेनने त्या-ला Image किंवा Representation म्हटले आहे.

FOR EDUCATIONAL USE

2) वेळ / काल / युगधर्म :-

साहित्यिक ज्या काळात / युगधर्मात जन्माला येतो त्या युगधर्माचा कळत-नकळत परिणाम त्याच्या व्यक्तिमत्वावर, साहित्यावर पडत असतो. युगधर्म ही एक समाजमनात जागृत झालेली विशिष्ट सार्वत्रिक जाणीव आहे असे म्हणता येते. समाजाने मान्य केलेला युगधर्म साहित्यनिर्मितीत कार्यकारी होतो असे इम्पोलियन तेनचे म्हणणे आहे. मध्ययुगीन मराठी साहित्यात धर्म आणि मोक्ष या युगधर्माचा सर्वत्र संचार दिसून येतो. आधुनिक काळामध्ये इंग्रजांच्या प्रभावातून प्रबोधनाचे युग अवतरले. विज्ञानाचा प्रसार वाढला आणि वास्तववादी युगधर्माची सुरुवात झाली.

अशाप्रकारे इम्पोलियन तेनने युगधर्माची संकल्पना मांडली आहे.

3) परिवेश / परिस्थिती / प्रसारमाध्यमे :-

परंपरेनुसार प्रत्येक समाजाची काही आविष्कार माध्यमे असतात. कोणत्या काळामध्ये कोणते वातावरण असेल त्यावरून साहित्याचे प्रकटीकरण कसे होते हे अभ्यासता येते. मराठी साहित्यामध्ये अभंग, ओवी, पदे, गौळणी, कीर्तन, प्रवचन, तमाशा लावणी, पोवाडा अशा माध्यमातून साहित्यनिर्मिती समाजापर्यंत पोहचली असल्याचे दिसून येते.

एखादया विशिष्ट प्रदेशामध्ये असलेले सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक वातावरण सुद्धा लेखकाच्या व्यक्तीमत्वावर प्रभाव पाडताना दिसते. या संस्कारातूनच त्याचे लेखन अवतरते.

अशाप्रकारे इम्पोलियन तेन या फ्रेंच विचारवंताने देश, काल, परिस्थिती या सिद्धान्ताच्या त्रिसूत्रीच्या माध्यमातून आपला साहित्यविचार मांडला आहे.

× —— × —— × —— × —— ×